




मराठी साप्ताहिक

# निसर्ग चक्र

संपादक: शिवम राजेंद्र वखरे

■ कार्यकारी संपादिका
सौ. सिमा राजेंद्र वखरे

■ Postal Regd.No. THC/262/2023-2025
■ RNI.No. MAHMAR/2022/83338
■ E Mail : nisargchakra2001@gmail.com

■ वर्ष : ०२
■ अंक : ४४
■ पाने : ४
■ कल्याण, जि. ठाणे
■ मंगळवार, दि. ०७ मे ते १३ मे २०२४
■ मूल्य : रु ५.००/-
■ आर. एन. आय.नं. एमएएचएमएआर/२०२२/८३३३८

■ Vol : 02 ■ Issue : 44 ■ Marathi Weekly ■ Pages : 4 ■ Kalyan, Dist Thane ■ Tuesday, Date : 07 May To 13 May 2024 ■ Price 5.00 /-


# अक्कलकोटमध्ये वटवृक्ष स्वामी समर्थ १४६ वा पुण्यतिथी सोहळा साजरा!

**सोलापूर (अक्कलकोट) : निसर्ग चक्र टीम :** अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराजांचा १४६ वा पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. प्रचंड उन्हाळा असूनही हजारो भाविक उष्म्याचा असह्य त्रास बाजूला ठेवून श्री स्वामी समर्थ चरणी नतमस्तक झाले. दुपारी अक्कलकोट राजघराण्याच्यावतीने श्रीमंत मालोजीराजे भोसले यांनी श्री चरणी महानैवेद्य अर्पण केला. भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. शेजारच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातही धार्मिक विधी होऊन हजारो भाविकांनी महाप्रसाद घेतला.

वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात पहाटे काकडारतीसह अन्य धार्मिक विधी झाल्यानंतर स्वामी दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. उन्हाचे चटके बसून नयेत म्हणून मंदिर समितीने दूर अंतरापर्यंत सावलीसाठी कापडी मंडप उभारून सोय केली होती. मंडपात शीतपेय, जलपानाचीही सेवा रुजू करण्यात आली होती. तसेच उष्माघाताचा त्रास टाळण्यासाठी इतर आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या. सकाळीपासून उन्हाचे चटके बसत होते. दुपारच्या तपळत्या उन्हातही स्वामी दर्शनासाठी भाविकांचा ओघ सुरूच होता. मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी श्री चरणी नैवैद्य अर्पण केला. त्यानंतर अक्कलकोट राजघराण्याच्या पूर्वापार परंपरेनुसार श्रीमंत मालोजीराजे भोसले यांनी मंदिरात येऊन श्री चरणी महानैवेद्य अर्पण केला. यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे आणि सचिव आत्माराम घाटगे यांच्यासह विश्वस्त महेश गोगी, उज्ज्वला सरदेशमुख आदींची उपस्थिती होती.

यानिमित्ताने मंदिरात सोलापूर, पंढरपूर, लातूर, बार्शी, सांगोला आदी भागातून ४६ भजनी मंडळांनी भजनसेवा रुजू केली. आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे आदींनी श्री स्वामी महाराजांचे दर्शन घेतले.

दुसरीकडे शेजारच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गेल्या सहा दिवसांपासून श्री स्वामी समर्थ रथोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विधिवत पूजाविधीसह पारायण आदी कार्यक्रम झाल्यानंतर मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्यासह आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष विनायक म्हशीलकर आदींच्या हस्ते श्री अन्नपूर्णा व महाप्रसादाचे पूजन करण्यात आले. अन्नछत्र मंडळातील नैवेद्य वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरासह बुधवार पेठेतील श्री स्वामी समर्थ समाधी मठात अर्पण करण्यात आला.



**अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराजांचा १४६ वा पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्ति भावाने साजरा झाला.**



## २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात
### सर्वसाधारण, खर्च व पोलीस निरीक्षक दाखल

**कल्याण : निसर्ग चक्र टीम :** भारत निवडणूक आयोगाने २४ कल्याण लोकसभा मतदारसंघासाठी सर्वसाधारण निरीक्षक, खर्च निरीक्षक व पोलीस निरीक्षकांची नियुक्ती केली असून हे तीनही निरीक्षक मतदारसंघात दाखल झाले असून त्यांनी कामकाजाला सुरूवात केली आहे.

२४ कल्याण लोकसभा मतदारसंघासाठी सर्वसाधारण निरीक्षक म्हणून मनोज जैन (आयएएस), खर्च निरीक्षक म्हणून श्री. नकुल अग्रवाल (आयआरएस) आणि पोलीस निरीक्षक म्हणून कु. इलाक्किया करुणागरन (आयपीएस) यांची भारत निवडणूक आयोगाने नियुक्ती केली असून हे तीनही निरीक्षक कल्याण लोकसभा मतदारसंघात दाखल झाले आहेत.

निरीक्षकांना भेटण्याची वेळ

२४ कल्याण लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक श्री.नकुल अग्रवाल यांना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका जलतरण तलाव कार्यालय, वै.ह.भ.प सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल, पेंढारकर कॉलेजजवळ, घारडा सर्कल डोंबिवली पूर्व ता. कल्याण येथे भेटण्याची वेळ दुपारी ४ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. केंद्रीय खर्च निरीक्षक श्री. नकुल अग्रवाल (आयआरएस) यांचा मतदारसंघातील संपर्क क्रमांक ८३६९७५१६५४ असा असून ExpobsŠŒkalyan@gmail.com हा त्यांचा ई-मेल आहे.

सर्वसाधारण निरीक्षक श्री. जैन (आयएएस) यांचा संपर्क क्रमांक ८७७९०३३९४५ व ०२५१-२९९०७२५ असा असून genobseerveerŠŒkalyan@gmail.com हा त्यांचा ई-मेल आहे. श्री.जैन यांना कुंजविहार बंगलो, सी-गेट, सेंचुरी रेयॉन कॉलनी, शहाड, उल्हासनगर येथे दुपारी ४.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत भेटता येईल.

तर पोलीस निरीक्षक कु. इलाक्किया करुणागरन (आयपीएस) यांचा संपर्क क्रमांक ८५९११७३३६८ हा असून ilakkiyaips‰Š@gmail.com हा त्यांचा ई-मेल आहे. कु.करुणागरन यांना रेमंडगेस्ट हाऊस, जे.के.ग्राम, पाचपाखाडी, ठाणे (प), येथे दुपारी ४.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत भेटता येईल.

## निवडणूक प्रचारासाठी सर्व प्रकारच्या परवानग्या घेणेकामी एक खिडकी योजना कार्यान्वित!

### आवश्यक परवानगी न घेता प्रचार केल्यास नियमानुसार कारवाई करणार -निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव

**भिवंडी : निसर्ग चक्र टीम :** २३, भिवंडी लोकसभा मतदार संघांतर्गत निवडणुकी करता उभे राहिलेले सर्व उमेदवार अंतिम झाल्यावर सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यावर सर्व केल्यावर सर्व उमेदवारांची स्थायी समिती स्थापन करण्यात आली असून या समितीची पहिली बैठक निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांच्या अधिपत्याखाली घेण्यात आली. या बैठकीला केंद्रीय खर्च विषयक निरीक्षक चित्तरंजन माझी, केंद्रीय सर्वसाधारण निवडणूक राजनविर सिंग कपूर उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी नमूद केले की, निवडणुकीचे कामकाज हे एकदम चांगल्या प्रकारे पार पाडण्याकरता सर्व उमेदवारांचे सहकार्य अपेक्षित आहे. उमेदवाराने प्रचाराच्या सर्व प्रकारच्या परवानग्या घेणे कामी निवडणूक निर्णय अधिकारी व सहाही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात एक खिडकी योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. उमेदवाराच्या प्रचारासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेणे आवश्यक आहे, कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता प्रचार केल्यास नियमानुसार कारवाई करणार असा इशारा निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिला.

या बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी सर्व प्रमुख राजकीय पक्षीय प्रतिनिधी, उमेदवार यांना सूचना केल्या की, निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार उमेदवार व राजकीय पक्षाने तीन वेळा प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडिया मधून उमेदवाराची माहितीचे जाहीर प्रकटन करणे आवश्यक आहे. निवडणुकीकरीता उमेदवाराने स्वतंत्र बँक खाते उघडावे व त्या खात्यातून सर्व निवडणूक खर्च करावा. प्रत्येक उमेदवाराला निवडणूक खर्चाची मर्यादा ९५ लाख आहे. उमेदवाराने केलेला सर्व खर्च केंद्रीय निवडणूक निरीक्षक तपासतील. उमेदवाराचा प्रचार सभा, रॅली याचे सर्वांचे व्हिडीओ शुटींग करण्यात येणार आहे. उमेदवाराला प्रचारासाठी लागणारी सर्व प्रकारची वाहने वापरणेकामी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक वाहनाचा खर्च हा स्वतंत्रपणे दाखवणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या परवानग्या घेण्यासाठी निवडणूक निर्णय़ अधिकारी यांच्या कार्यालयात तसेच सर्व सहाही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात एक खिडकी योजना सुरू करण्यात आल्या आहेत. सर्व प्रकारच्या परवानग्या घेण्यासाठी किमान तीन दिवस आगोदर अर्ज करून परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या निकषावर सर्व परवानग्या देण्यात येतील. उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी ईव्हीएम मशीन आणतेवेळी, स्ट्रॉंग रूम मध्ये ठेवताना उपस्थित राहू शकतात. कोणत्याही प्रकारचे प्रचार साहित्य प्रसिध्द करणेकामी निवडणूक निर्णय अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच समाज माध्यम (सोशल मिडीया) व इलेक्ट्रानिक मिडीयावर प्रचार करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधून जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. पूर्व परवानगी न घेता कोणत्याही प्रकारचे प्रचाराचे साहित्य प्रसिध्द करण्यात येऊ नये, तसेच कोणतीही परवानगी नसताना कोणतेही वाहन वापरता येणार नाही किंवा तसेच कोणताही प्रचार करता येणार जर नियमांचे व कायद्यांचे उल्लघंन झाल्यास त्या उमेदवार व पक्षावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असा इशारा देखील निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिला आहे.

केंद्रीय खर्च विषयक निरीक्षक चित्तरंजन माझी यांनी उमेदवाराने सर्व खर्च व्यवस्थित ठेवणे अपेक्षित असून सर्व उमेदवार यांच्या खर्चाची प्रथम तपासणी ९ मे, द्वितीय तपासणी १४ मे आणि तृतीय तपासणी १८ मे रोजी होणार असल्याची माहिती चित्तरंजन माझी यांनी या बैठकीत दिली. तर सर्वसाधारण केंद्रीय निवडणूक निरीक्षक राजनवीर सिंग कपूर यांनी सांगितले की, निवडणुकीच्या बाबतीत जर तक्रार करून तक्रारीची दखल घेत नाही, असे निदर्शनास आल्यावर केंद्रीय निवडणूक निरीक्षक यांच्याशी आपण मेलवर तक्रार शकता. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ही चांगल्या प्रकारे खेळीमेळीच्या प्रकारे पार पाडणे, ही आपणा सर्वांची आता जबाबदारी आहे असेही देखील त्यांनी नमूद केले. मुख्य निवडणूक कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे त्याचा नंबर असा आहे

१८०० २३३ १११४ या नंबरवर तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मेलवर आपण तक्रार नोंदवू शकता अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिली.

## २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघांतर्गत ९ उमेदवारांनी उमेदवारी घेतली मागे

**ठाणे : निसर्ग चक्र टीम :** २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघांतर्गत आज दि. ६ मे २०२४ रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी नऊ उमेदवार यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे, अशी माहिती २३-भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिली आहे.

२३ भिवंडी लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या खालील उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्रे मागे घेतले आहे.

1.सुमित सुरेश म्हात्रे 2.उमेश जयवंत चौधरी 3. पंढरीनाथ ज्ञानेश्वर जाधव 4. सुरेश काळूराम जाधव ५. मोनिका मोहन पानवे ६.डॉ. नुरुद्दीन निजाम अंसारी ७.आकाश दिलीप शर्मा नरेंद्र ८. काना सापळे आणि ९. नारायण प्रताप वंगा या नऊ उमेदवारांनी आपली उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता प्रत्यक्षात २७ उमेदवार राहणार आहेत.

निवडणूक रिंगणात असलेल्या २७ उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे-

राष्ट्रीय पक्षाचे एकूण ३ उमेदवार...1.कपिल मोरेश्वर पाटील....भारतीय जनता पार्टी 2.मुमताज अन्सारी... बहुजन समाज पार्टी 3.सुरेश गोपीनाथ म्हात्रे.

राष्ट्रवादी उमेदवार...
1.कपिल मोरेश्वर पाटील.... भारतीय जनता पार्टी
2.मुमताज अन्सारी... बहुजन समाज पार्टी
3.सुरेश गोपीनाथ म्हात्रे. राष्ट्रवादी बहुजन महा पार्टी
४.राम सुरेश पांडागले... अपनी प्रजाहित पार्टी
५.सैफान चांद पठाण.. भारतीय मानवता पार्टी
६.मोहम्मद कलीम अन्सारी पीपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक
७.मोह.अक्रम अब्दुल खान... AIMIM

एकूण अपक्ष 17 उमेदवार
१.कपिल जयहिंद पाटील.
2. चंद्रकांत मोटे
3. मनीषा गोधळे
४. मनोज तुरे
५. मिलिंद काशिनाथ कांबळे
६. रंजना त्रिभुवन
७. वसीम सिद्दीकी
८. विशाल मोरे ९. शंकर मुटकिरी १०. अमिरुल हसन सय्यद 11. जहीद मुख्तार अन्सारी 12. हर्षद म्हात्रे 13. तारा पिंट्या वाघे 14. सोनाली गंगावणे 1५. सुरेश सिताराम म्हात्रे 1६. राहुल काठवले 1७. निलेश सांबरे

## २४ कल्याण लोकसभा मतदारसंघांतर्गत २ उमेदवारांची माघार तर २८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**ठाणे : निसर्ग चक्र टीम :** २४ कल्याण लोकसभा मतदारसंघांतर्गत आज दि. ०६ मे २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत १) रमेश सुदाम जाधव - अपक्ष व २) जामील अहमद जुबेर खान - अपक्ष या दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली असून, खालील अंतिम २८ उमेदवार आता निवडणुकीच्या रिंगणात आहेत, अशी माहिती २४ कल्याण मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी दिली आहे.

निवडणुकीच्या रिंगणातील अंतिम २८ उमेदवार पुढीलप्रमाणे- १प्रशांत रमेश इंगळे – बहुजन समाज पार्टी २) वैशाली दरेकर-राणे – शिव सेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ३) श्रीकांत एकनाथ शिंदे – शिव सेना ४) अमीत उपाध्याय – राईट टु रिकॉल पार्टी ५) अरुण भाऊराव निटूरे – राष्ट्रीय किसान बहुजन पार्टी **उर्वरीत पान नं.३ वर ...**

## GM क्रिकेट अकॅडमी आयोजित GM प्रीमियर लीग सामने डोंबिवली येथे संपन्न...

**डोंबिवली : निसर्ग चक्र टीम :** डोंबिवली मधील जी-एम क्रिकेट अकॅडमीच्या वतीने दरवर्षी जी एम प्रीमियर लीग क्रिकेट सामने घेतले जातात. याही वर्षी मुख्य प्रशिक्षक श्री गोपाल श्रीयान यांच्या मार्गदर्शनाखाली



कुंभारखानपाडा, गणेश घाट मैदान,डोंबिवली पश्चिम येथे जी एम पी एल क्रिकेट सामने आयोजित केले होते. या जी-एमपीएल क्रिकेट सामन्याचे वर्ष सहावे आहे. या क्रिकेट सामन्यांमध्ये १० वर्षे, १२ वर्षे व १४ वर्षे च्या आतील वयोगटातील मुलांसाठी क्रिकेट सामने आयोजित केले गेले होते. गेले आठवडाभर हे सामने बघायला मिळाले. यामध्ये १० वयोगटातील मुलांमध्ये जी-एम लिटिल बॉईज व जीएम लिटिल स्टार हे दोन संघ अंतिम फेरीमध्ये पोहोचले व अखेर जीएम लिटिल स्टार हा संघ विजेता घोषित ठरला तर १२ वयोगटातील मुलांमध्ये जीएम इंडियन व जीएम रॉयल्स हे दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहोचले या दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत बघायला मिळाली यामध्ये जीएम रॉयल संघ विजेता ठरला तर १४ वर्षाच्या मुलांमध्ये जीएम टायगर व जीएम पँथर हे संघ अंतिम फेरीत पोहोचले या दोन्ही संघांमध्ये जीएम टायगर हा संघ विजेता ठरला.

जीएमपीएल क्रिकेट सामने यशस्वी होण्यासाठी प्रमुख प्रशिक्षक श्री गोपाल श्रीयान यांच्यासोबतच जी एम क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक सुनील श्रीयान, मंदार तांबे , पठाण सर , अशोक बंजान, संतोष जोशी, मुकेश चव्हाण, प्रवीण शिणघे यांचा देखील मोलाचा वाटा आहे.

जीएम क्रिकेट अकॅडमी चे मुख्य प्रशिक्षिक श्री गोपाल श्रीयान हे असून सध्या त्यांच्या अकॅडमीमध्ये 200 हून अधिक मुले क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहेत. आपल्या अकॅडमीच्या माध्यमातून उत्तम फलंदाज, उत्तम गोलंदाज तयार व्हावेत आणि युवा पिढीने क्रिकेटमध्ये उत्तम कामगिरी करावी हा गोपाल सरांचा उद्देश आहे. हल्लीच काही दिवसापूर्वी

डोंबिवली कॅम्पमधून जीएम क्रिकेट अकॅडमी मधील पाच मुले मुंबई क्रिकेट अकॅडमी ( MCA) मध्ये निवड करण्यात आली आहे. त्यामूळे जी एम क्रिकेट अकॅडमीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.


: निसर्ग चक्र : मुख्य कार्यालय : आई द्रौपदा बिल्डिंग, ३०४, शंकेश्वर पाम्सजवळ, साई बाळाराम कॉम्प्लेक्स समोर, खंडोबा मंदीर रोड, डोंबिवली (प.) ता.कल्याण जि. ठाणे - ४२१२०२ मोबा. ९६१९६३००३५ / ९९८७४९६१३६


## ठाण्यातील रेहान सिंह बारावी ICSE बोर्डात भारतात पहिला
## ४०० पैकी ३९९ गुण




**ठाणे : निसर्ग चक्र टीम :** ठाण्यातील रेहान सिंह याला बारावी आयसीएसई बोर्डात ९९.७५ टक्के गुण मिळाले आहे. त्याचा १०० टक्के निकाल फक्त एका गुणाने हुकला आहे. रेहानला ४०० पैकी ३९९ गुण मिळाले आहेत.

येथील सुलोचनादेवी सिंघानिया शाळेतील मानव्यविद्या शाखेचा विद्यार्थी रेहान सिह संपूर्ण भारतातून पहिला आला आहे. भारतीय परराष्ट्र सेवेत भरती होण्याची इच्छा आपल्या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना रेहान सिंह म्हणाला की, माझे आई-वडील आणि माझ्या शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मला हे यश मिळालं आहे. मला साहित्य, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि इतिहास वाचायला नेहमीच आवडतं. मला कविता आणि इतरही गोष्टींवर लिहायला आवडतं. यूपीएससीच्या माध्यमातून भारतीय परराष्ट्र सेवेतद्वारे देशाची सेवा करणे, हे माझं स्वप्न आणि ध्येय आहे.

# संपादकीय...



" स्वताचा विकास करा. ध्यानात ठेवा, गती आणि वाढ हीच जीवंतपणाची लक्षणे आहेत "

## याचा राग यायला हवा...

**''भारतीय बाजारपेठेपासनं सावध राहा'' असा इशारा आपली मित्र वगैरे असलेली अमेरिकाच देते. आता यावर आपण अमेरिकेवर काय कारवाई करणार? - गिरीश कुबेर**

ज्याचा राग यायला हवा, त्याचा राग येणं हे शहाणपणाच्या मार्गावरचं महत्त्वाचं स्थानक असतं. पण बहुतेकांची गाडी याच स्थानकावर चुकते. ज्यावर संतापून जायला हवं, ते कारण निसटून जातं आणि एखाद्या भलत्याच मुद्द्यावर अनेक जण रागावतात..

चीन आणि अमेरिका यांचे संबंध तसे तुझं माझं जमेना.. अशाच छापाचे राहिलेले आहेत. विख्यात मुत्सद्दी हेन्री किसिंजर यांच्या चातुर्यामुळे माजी अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी १९७२ साली पहिल्यांदा चीनचा दौरा केला आणि तेव्हापासून या दोन देशांत अधिकृत संबंध प्रस्थापित झाले. तेव्हाचे माओ आणि नंतरचे डेंगशियाओपिंग यांना अधिकाधिक आपल्याकडे वळवण्यासाठी प्रत्येक अमेरिकी अध्यक्ष चीनवर प्रेमाचा वर्षाव करत आला. त्यात १९८९ साली तिआननमेन हत्याकांड घडलं आणि या प्रेमाला जरा खीळ बसली. त्यानंतर अमेरिकेत अध्यक्षपदी आले बिल क्लिंटन. त्यांच्या काळात तर हे प्रेम अगदी उतू गेलं. त्या वेळी क्लिंटन चांगले दहा दिवस ऐसपैसपणे चीन दौऱ्यावर होते.

सगळ्या अमेरिकी अध्यक्षांचा चीनविषयी एक समज होता. तो म्हणजे या देशाशी जास्तीत जास्त व्यापार वाढवायचा, त्या देशाला अमेरिकी बाजारपेठेत अधिकाधिक सवलती द्यायच्या आणि त्या देशातल्या कंपन्यांना वाढण्यासाठी सर्व ती मदत करायची. आणि हे का करायचं? चीनशी जितका आपला, लोकशाही देशांचा व्यापार वाढेल तितका चीन अधिकाधिक लोकशाहीवादी होईल. हा समज किती बावळटपणाचा होता, हे आजच्या चीनकडे पाहिल्यावर अमेरिका आणि अन्य लोकशाहीप्रेमी देशांच्या आता लक्षात आलं असेल. असो. तर चीनशी अधिकाधिक व्यापार वाढवण्याचा (गैर)फायदा प्रत्यक्षात घेतला कोणी?

तर चिनी कंपन्यांनी. कशा प्रकारे? तर अमेरिकी उत्पादनांची नक्कल करून. चीननं त्या काळात कॉपी करण्यापासून एक अमेरिकी उत्पादन, तंत्रज्ञान सोडलं नाही. दूरसंचार, अवकाशविद्या, औषधविद्या, रसायनं, चारचाकी मोटारी..

अशा प्रत्येक क्षेत्रात चिनी तंत्रज्ञांनी अमेरिकी उद्योगात शिरून त्यांच्या ज्ञानाची, तंत्राची कॉपी केली. हा प्रकार इतका सर्रास होत होता की ज्या वेळी डेंग शियाओपिंग अमेरिकेच्या दौऱ्यात त्या देशाच्या राजकारण्यांना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात गुरफटून टाकण्यात मग्न होते त्या वेळी त्यांच्या समवेत अमेरिकेत गेलेलं चिनी उद्योगपतींचं पथक अनेक उत्पादनांच्या तंत्रज्ञानाची कॉपी करण्यात मग्न होतं. त्याही वेळी खरं तर अनेक अमेरिकी कंपन्यांनी आपल्या सरकारचं याकडे लक्ष वेधलं. तक्रारी केल्या. पण अमेरिकी सत्ताधीशांनी चीन-प्रेमापोटी, चीनला आपल्या गोटात ओढण्याच्या नादात या सगळ्यांकडे दुर्लक्ष केलं.

..आणि अमेरिकेला जाग आली तोपर्यंत अमेरिकी बाजारपेठ चिनी उत्पादनांनी दुथडी भरून वाहू लागली होती. त्यांना जागं व्हायला चांगलाच उशीर झाला होता. अनेक चिनी कंपन्यांनी विविध अमेरिकी उत्पादन निर्मितीच्या तंत्राची एव्हाना कॉपी केली होती आणि त्यांच्या उत्पादनांना सुरुवातही झाली होती. मग अमेरिकेनं काय केलं?

तर चीनला बौद्धिक संपदा 'चोर' ठरवत त्या देशाचा समावेश 'लक्ष ठेवायला हवे' अशा वर्गवारीत केला. या गटात समावेश ज्यांचा होतो त्या देशातल्या कंपन्यांशी करार-मदार करताना विकसित देशातल्या कंपन्या, सरकारे हात आखडता घेतात. व्यापारउदिमावर मर्यादा येतात आणि या यादीतल्या देशांच्या प्रामाणिकपणावर संशय घेतला जातो. थोडक्यात जागतिक मंचावर जो काही मानसन्मान मिळायला हवा तो मिळेनासा होतो. मिळाला तरी तो देणारे हात आखडता घेतात. हे सर्व चीनच्या बाबत गेली काही वर्ष घडतंय. त्या देशातल्या प्रत्येक घडामोडीकडे, संशोधनाकडे संशयानंच पाहिलं जातंय आणि चीनला अनेक गोष्टी नाकारल्या जातायत. कॉपी करण्याची सवय न सोडल्याबद्दल ही त्या देशाला विकसित देशांनी दिलेली शिक्षा!

आपण यातलं काहीही केलेलं नाही.

अमेरिकी कंपन्यांच्या तंत्रज्ञानाची कॉपी केलेली नाही. आपल्या एखाद्या कंपनीनं असं काही करून अमेरिकी बाजारपेठांत घुसखोरी केली असंही झालेलं नाही. अमेरिकेत आज घराघरात आपल्या एखाद्या उत्पादनाची चर्चा आहे, त्याशिवाय अमेरिकनांचं पान अडलंय.. असं काहीही झालेलं नाही.

पण तरीही अमेरिकेनं कॉपी करणाऱ्या देशांच्या मालिकेत आपल्याला बसवलंय. चीनच्या शेजारी आपला पाट मांडलाय. इंडोनेशिया, रशिया, चिली आणि व्हेनेझुएला हे आपले या कॉपी करणाऱ्यांच्या पंगतीतले 'भोजनभाऊ". आणि हे एकदा नाही, तर दुसऱ्यांदा झालंय. अमेरिकेकडनं दरवर्षी बौद्धिक संपदा कायद्याचा आदर/अनादर करणाऱ्या देशांची एक 'प्रायोरिटी वॉच' अशी यादी जाहीर केली जाते. तीत गेल्या वर्षी पहिल्यांदा आपला समावेश केला गेला. दरवर्षी त्याचा एक आढावा घेतला जातो. त्या देशांचं नव्यानं मूल्यमापन केलं जातं आणि नवी श्रेणी निश्चित केली जाते. या वर्षीच्या या यादीत आपण पुन्हा एकदा आहोत. कोणकोणत्या मुद्द्यांवर ही यादी बनवली जाते?

बौद्धिक संपदेचा आदर करणारी व्यवस्था त्या त्या देशांत आहे का? असल्यास बौद्धिक अनादराची किती प्रकरणं त्या देशांत नोंदवली गेली? त्यांच्यावर काय काय कारवाया केल्या गेल्या? बनावट वा नामसाधर्म्याचा फायदा उठवणारी किती औषधं त्या त्या देशांत तयार करून बाजारपेठेत ताठ मानेनं विकली जातात? एखाद्याच्या ट्रेडमार्कचा आदर त्या त्या देशांत होतो का? ट्रेडमार्कचं उल्लंघन झालं तर किती त्वरेनं कारवाई केली जाते? एकापेक्षा अधिक आस्थापनांमधल्या करार-मदारांचा किती आदर केला जातो? इंटरनेटच्या व्यापक प्रसारामुळे हल्ली सगळयांना सगळी माहिती असते. देशोदेशांत असे गूगलतज्ज्ञ पैशाला पासरीभर मिळत असतात. माहितीच्या-ज्ञानाच्या नाही- अशा व्यापक जाळयामुळे उत्पादन, त्यासाठी झालेलं संशोधन आणि बौद्धिक संपदा सांभाळणं अधिकच जिकिरीचं झालंय. तेव्हा या युगाला सामोरं जाण्यासाठी आणि या माहिती प्रस्फोटाच्या काळात पेटंट, बौद्धिक संपदा यांचा आदर केला जाईल हे पाहण्यासाठी जगातल्या प्रमुख देशांत एक करार झाला.

'वर्ल्ड इंटलेक्चुअल प्रॉपर्टी ऑर्गनायझेशन' अशी एक संघटना उदयाला आली आणि या संघटनेतर्फे दोन करार केले गेले. 'कॉपीराइट ट्रिटी' आणि 'परफॉर्मन्सेस अँड फोनोग्राम्स ट्रिटी'. आपण अन्य अनेक करारांप्रमाणे या करारास मान्यता तर दिली. पण त्याची अंमलबजावणी आपल्याकडे यथातथाच आहे. ऑनलाइन चोऱ्या, त्या रोखण्यात आणि त्यांचा माग काढण्यात येत असलेलं अपयश, यामुळे प्रामाणिक बौद्धिक संपदेचा होणारं सर्रास उल्लंघन ही आपली न बरी झालेली आणि त्यावर उपचार न सापडलेली दुखणी आहेत. हे आपल्याला अनेकदा दाखवून दिलं गेलंय. पण तरी सुधारणेच्या नावानं तशी बोंबच! गेल्या वर्षी तर या कॉपीराइट भंगाचा कहर झाला. आपल्या देशात चांगल्या, संशोधनसिद्ध औषधं/रसायनं यांची इतकी बनावट प्रतिरूपं तयार झाली की बौद्धिक संपदेचा किती बट्ट्याबोळ आपण करू शकतो ते जगाला दिसलं. अमेरिकी बाजारपेठेत घुसण्याचा प्रयत्न करणारी अशी अनेक औषधं/रसायनं त्या देशाच्या यंत्रणांनी पकडली. ही अशी बनावट उत्पादनं प्रामुख्यानं तीन देशांतनं आलेली होती. चीन, सिंगापूर आणि भारत. इतकंच नाही तर या औषधं/रसायनांच्या जोडीला सेमीकंडक्टर, इंटिग्रेटेड सर्किट्स, मोटारींचे सुटे भाग, कपडे, बडया ब्रँड्सची पादत्राणं, खेळणी, क्रीडा साधने.. एक ना दोन. अशा अनेक घटकांच्या बनावट उत्पादनांनी आपली बाजारपेठ किती 'समृद्ध' आहे तेही जगाला कळलं.

या सगळयाचा अर्थ इतकाच की ''भारतीय बाजारपेठेपासनं सावध राहा'' असा इशारा आपली मित्र वगैरे असलेली अमेरिकाच देते. आता यावर आपण अमेरिकेवर काय कारवाई करणार? असो. आणि आणखी एक मुद्दा. आपला बौद्धिक संपदा निर्देशांकही गतसाली होता तिथेच आहे. यात ५५ देशांत आपण ४२ व्या स्थानावर आहोत. इच्छुकांच्या सहज माहितीसाठी: २०१४ साली आपण २० व्या स्थानी होतो..

राग आपल्याला याचा यायला हवा!

खरोखर विकसित व्हायचं असेल तर..! बाकी मुठी आवळणं, घोषणा वगैरे सर्व बहुजनप्रिय आहेच..

# जैवतंत्रज्ञानासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र खाते हवे!

**एकूण ११६२ बायोटेक स्टार्टअप्सचा आधार महाराष्ट्रात असून, बायोटेक्नॉलॉजी स्टार्टअप समूहाची वाढ २० टक्के दराने होत आहे. आपल्याकडे राज्याचे म्हणून जैवतंत्रज्ञान धोरण आहे, पण ते २० वर्षे जुने. या क्षेत्राची वेगाने होणारी वाढ, त्यात असलेली स्पर्धा पाहता कालानुरूप धोरण आखण्याची, ते अमलात आणण्याची गरज आहे. - शांभवी नाईक**

भारतीय जैव-अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचे सर्वाधिक योगदान आहे. महाराष्ट्रामुळे देशाच्या जैव-अर्थव्यवस्थेत ३७ अब्ज डॉलर्सहून अधिक रकमेची भर पडते. हे प्रमाण २७ टक्के आहे. म्हणजेच सापेक्ष मूल्य आणि प्रत्यक्ष मूल्याच्या या दोन्हींमध्ये देशाच्या जैव-अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र अव्वल आहे.याचे प्राथ-मिक कारण म्हणजे आपले हे राज्य जैवविविधतेच्या दृष्टीने समृद्ध आहे – ७२० किमीचा समुद्रकिनारा, नऊ जैवविविधता वारसा स्थळे, विविध वनस्पती आणि प्राणी अशी जैवविविधता संपदा महाराष्ट्राला लाभली आहे.

या जैवविविधतेचा उपयोग आगामी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आर्थिक विकासासाठी करता येईल. त्याचबरोबर, महाराष्ट्राचा तंत्रज्ञान क्षेत्रात भक्कम पाया आहे. राज्यातील बायोफार्मास्युटिकल क्लस्टर हे देशातील सर्वात मोठे तर आहेच, पण सर्वाधिक वेगाने वाढत आहे.

महाराष्ट्राला एकूण ११६२ बायोटेक स्टार्टअप्सचा आधार असून, बायोटेक्नॉलॉजी स्टार्टअप समूहाची वाढ २० टक्के दराने होत आहे. परंतु जैवतंत्रज्ञानाचे केंद्र असूनही, जैवतंत्रज्ञानाला सातत्याने प्रोत्साहन देण्याची जबाबदारी घेऊ शकेल असा एकही विभाग राज्यात नाही.

कर्नाटक (१४४८ दशलक्ष डॉलर्स) आणि गुजरात (६५८.९२ दशलक्ष डॉलर्स) या राज्यांमध्ये विज्ञान किंवा जैवतंत्रज्ञानाचे मंत्रालयीन विभाग आहेत, त्यांनी २०१३-२०२० या कालावधीत महाराष्ट्रापेक्षा (६२६.७८ दशलक्ष डॉलर्स) सातत्याने अधिक निधी दिला आहे. महाराष्ट्राला त्याच्याकडचे एकमेव उत्पादन केंद्र एका जीवतंत्रज्ञान 'इनोव्हेशन" केंद्रात विकसित करायचे असेल आणि त्यातून तंत्रज्ञानाधारित लाभ मिळवायचा असेल तर मंत्रालयात विशिष्ट विभाग नेमण्याची गरज आहे, जेणेकरून या विभागासाठी नि-राळी अर्थसंकल्पीय तरतूद केली जाऊ शकेल आणि ही तरतूद जैवतंत्रज्ञान विकासासाठीच केंद्रित राहील.

**–संकलन–**
**राजेंद्र श्रावण वखरे**
**(वृत्त संपादक)**
**निसर्ग चक्र**

अलीकडच्या काळात महाराष्ट्राने बायोमॅन्युफॅक्चिरगला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या औद्योगिक धोरणात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगही जैवतंत्रज्ञान विकासाला दिशा देण्याचे काम करतो आहे. मात्र, राज्याचे शेवटचे अधिकृत जैवतंत्रज्ञान धोरण २० वर्षांहून अधिक जुने आहे. विकासाची तीव्र गती आणि वाढती आंतरराष्ट्रीय स्पर्धा लक्षात घेता, सध्याच्या पायाभूत सुविधांचा फायदा घेण्यासाठी महाराष्ट्राकडे कुशल आणि नवीनतम जैवतंत्रज्ञान धोरण असणे आवश्यक आहे.

जैवतंत्रज्ञान विभागाची स्थापना पाच प्रकारे फायदेशीर ठरेल – (अ) वर्षानुवर्षे समर्पित निधी; (ब) इतर मंत्रालयांशी वाटाघाटी करण्याची क्षमता; (क) परदेशी कंपन्या आणि राज्यांशी वाटाघा टी करण्याचा अधिकार; (ड) भविष्यातील गरजांचे विश्लेषण करणे; आणि (ई) कार्यक्षमता वाढविण्यासाठी शासन यंत्रणा सुरळीत करणे.

जीवतंत्रज्ञान क्षेत्रात नवे काही घडवण्यास दीर्घ कालावधी लागतो आणि संशोधन फलित आणि व्यावसाययोग्य होण्यास काही वर्षे लागू शकतात. नवनवीन जैवतंत्रज्ञान उपाय विकसित करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह निधी नियोजन आवश्यक आहे. वेगळा जैवतंत्रज्ञान विभाग स्थापन झाल्यास त्याद्वारे अशा दीर्घकालीन प्रकल्पांचे नियोजन, आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुदींसह केले जाऊ शकते आणि कामाची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्पाच्या वेळापत्रकावर लक्षही ठेवले जाऊ शकते.

विविध विभागांसाठी मध्यस्थ

हा विभाग पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधीची तरतूद करू शकेल. राज्याच्या महत्त्वाच्या प्रकल्पांची निवड करू शकेल, आणि महाराष्ट्रातील अद्वितीय जैवविविधता प्रसार आणि विद्यमान जैवतंत्रज्ञान पायाभूत सुविधांचा वापर करणारे नवीन प्रकल्प सुलभ करू शकेल. एरवीही जैवतंत्रज्ञानाचा विविध मंत्रालयांशी संबंध येतो. उदाहरणार्थ, आरोग्य मंत्रालय बायोफार्मास्युटिकल उपयोजनांवर परिणाम करते किंवा वनस्पतींमधील 'जीन एडिटिंग' उपयोजनांसाठी पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी आवश्यक असते. अशा वेळी राज्य सरकारमधील एक विशिष्ट जैवतंत्रज्ञान विभाग इतर संबंधित मंत्रालयांशी समन्वय साधण्यासाठी, त्यांच्या चिंतांचे निराकरण करण्यासाठी किंवा जैवतंत्रज्ञान नवनिर्मितीला सुरक्षित आणि सर्वसमावेशक पद्धतीने प्राधान्य देण्यासाठी आवश्यक मंजुरी मिळवण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून काम करू शकतो. आजघडीला बायोटेक्नॉलॉजी इनोव्हेशनसाठी अनेक शासकीय मंजुरी आवश्यक असतात : पर्यावरण संरक्षण मूल्यांकनापासून नैतिक समित्या आणि व्यावसायीकरण मंजुरीपर्यंत. वास्तविक एकच विभाग या प्रक्रियेत सुसूत्रता आणू शकतो आणि या मंजुरी प्रणालीमुळे निर्माण होणारा संशोधनातील विलंब कमी करू शकतो.

उदाहरणार्थ, आसामच्या जैवतंत्रज्ञान धोरणात गुंत-वणूकदारांना जैवतंत्रज्ञान नियमनाच्या गुंतागुंतीतून मार्ग दाखवण्यासाठी आणि विश्वास निर्माण करण्यासाठी एक खिडकी सेवेचा (सिंगल विंडो क्लीअरन्स सिस्टिमचा) प्रस्ताव आहे. महाराष्ट्रात काम करू इच्छिणाऱ्या परदेशी विद्यापीठे किंवा कंपन्यांसाठीही हा विशिष्ट विभाग मध्यस्थाचे काम करू शकतो. महाराष्ट्राच्या सामर्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि सक्रियपणे जैवतंत्रज्ञान कंपन्यांपर्यंत पोहोचून त्यांना आकर्षित करण्यासाठी हा विभाग तज्ज्ञ समित्यांचा समन्वय साधू शकतो. यातून महाराष्ट्रातील सध्याची जैवतंत्रज्ञान केंद्रे आणि परिसंस्था यांची वाढ होईल आणि त्यातून पुढे अनेक नव्या कंपन्यांची वाट सुकर होईल.

शैक्षणिक पातळीवर चालना

त्याचप्रमाणे जैवतंत्रज्ञान कौशल्याचे प्रशिक्षण देऊ शकणाऱ्या तंत्रनिकेतन महाविद्यालयांची उपलब्धताही महाराष्ट्रात आहे. तेथील विद्यार्थ्यांना संशोधन आणि बायोमॅन्युफॅक्चिरग या दोन्ही क्षेत्रांत वापरता येईल असे अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकण्याचे मार्ग निर्माण करण्यासाठी राज्य सरकारचा जैवतंत्रज्ञान विभाग, विद्यमान आणि नवीन परदेशी संस्थांशी संपर्क साधू शकतो. परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश करता येईल, असा बदल नुकताच सरकारी धोरणात झाला आहे. महाराष्ट्र या संधीचा वापर करून उत्कृष्ट विद्यापीठांना आकर्षित करू शकतो. यातून रेणवीय जीवशास्त्र, पेशीविज्ञान, जैवप्रक्रिया (मॉलेक्युलर बायोलॉजी, सेल बायोलॉजी, बायोप्रोसेसिंग) या विषयांखेरीज नवीनतम जैवतंत्रज्ञान प्रक्रियांचे प्रशिक्षण देता येईल.

जैवतंत्रज्ञानात राज्याच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख घटक बनण्याची क्षमता आहे. मात्र यासाठी राज्याकडे कुशल धोरण मात्र हवे! जैवऊर्जा, जैवशेती आणि बायोफार्मा या क्षेत्रांमुळे महाराष्ट्राला पोषणसंबंधित सुरक्षितता, शाश्वत विकास आणि आरोग्य सुरक्षिततेची उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत होऊ शकते.त्यासाठी जैवतंत्रज्ञान विभागाला राज्याच्या भविष्यातील गरजांचे मूल्यमापन करावे लागेल आणि वेळीच उपाययोजना तयार करण्यासाठी तांत्रज्ञानिक विकासात गुंतवणूक करावी लागेल. उदाहरणार्थ, अलीकडील कर्नाटक जैवतंत्रज्ञान धोरणाने भविष्यातील प्रकल्पांची आखणी केली आहे ज्यामुळे जीन एडिटिंगला प्रोत्साहन मिळेल किंवा राज्याच्या अंतराळ क्षेत्रातील क्षमतेचा वापर करून अंतराळात उपयोगी ठरतील अशा जैवतंत्रज्ञान उपयोजनांचा शोध घेता येईल. आपली जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील ध्येये साध्य करण्यासाठी महाराष्ट्राची सुरुवात उत्तम प्रकारे झाली आहे परंतु वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानाचा फायदा कायम ठेवण्यासाठी अधिक सक्रिय होण्याची गरज आहे. बायोटेक्नॉलॉजी रोडमॅप तयार करू शकतो, आवश्यक निधी गोळा करू शकतो आणि अनुकूल नियंत्रणात्मक वातावरण तयार करू शकतो, असा हा विशिष्ट विभाग प्रगतीला गती देण्यास मदत करू शकेल. एका सशक्त जैवतंत्रज्ञान केंद्रामुळे महाराष्ट्राच्या जैव-अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, रोजगारनिर्मिती होईल आणि महाराष्ट्राच्या अंगभूत जैवविविधतेचा नियमितपणे वापर होईल.

लेखिका तक्षशिला संस्थेच्या संशोधन प्रमुख आणि प्रगत जीवशास्त्र कार्यक्रमाच्या अध्यक्षा आहेत.

# 'राजकारण' एक चिंतन

**डॉ.गजानन आंबेकर**

राजकारण ही अनेक व्यक्तींनी एकत्रितरित्या निर्णय घेण्याची प्रक्रिया आहे. प्रत्येक राष्ट्रामध्ये सत्ता मिळवण्यासाठी व देश चालविण्यासाठी अनेक नेते जे निर्णय घेतातू व जे काम करतात त्यास राजकारण म्हणतात. राजकारण काही नुसतं निवडणुकांपुरतं मर्यादित नाही.राजकारणाचा अर्थ खूप व्यापक आहे. राजकारणाचा हेतू खूप मोठा आहे. दुर्दैवाने आपण तशा व्यापक अर्थाने त्याच्याकडे पाहतच नाही. आपला देश किंवा आपले राज्य कसं चाललं पाहिजे? कुठल्या तत्त्वांवर चाललं पाहिजे? त्याचे आग्रह काय असले पाहिजेत? राज्य कशासाठी चालवलं पाहिजे? याचा विचार मांडणं, त्या विचारांचा आग्रह धरणं आणि तो पूर्ण करण्यासाठी सत्तेत येणं, सत्तेत येण्यासाठी निवडणुका लढवणं, त्या जिंकणं, त्या जिंकण्यासाठी आपला विचार लोकांना पटवून देणं व नंतर ते सत्यात उतरवणं म्हणजे राजकारण'.

सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक घटकांच्या प्रभावाने विशिष्ट विचार अंगीकारुन विशिष्ट समाज, समुह, संस्था, भूभाग यावर सत्ता मिळविण्यासाठी व सत्ता, प्रभुत्व कायम ठेवण्यासाठी केलेली कृती म्हणजे राजकारण. राजकारण फक्त निवडणुकीपुरतं किंवा लढायांपुरतं मर्यादित नाही. राजकारणाला विचार असणं व त्या विचारांना मूल्यांचा आधार असणं व हेतू असणं आवश्यक आहे. राजकारणाला काही श्रद्धा व हेतू असणं आवश्यक आहे. असा विचार प्रत्येक नागरिकाने व राजकारण्यांनी ठेवणं गरजेचं आहे. आपल्याला काय करायचंय हे आधी निश्चित करायला हवं,आपली दिशा पक्की असायला हवी. आपण सर्व नागरिकांनी सर्वांनी मिळून एक मोठ्या माणुसकीचं जग व जगात शांतता नांदेल, प्रत्येक हाताला काम मिळेल, शेतकरी सधन होईल असं काम करणं व ती व्यवस्था निर्माण करणं अत्यंत आवश्यक आहे तेव्हाच अखंड राष्ट्र सुखी झाले असे म्हणता येईल. राजकारण हे केवळ निवडणुकी पुरते मर्यादित नाही. आर्य चाणक्यांनी जे चंद्रुप्ताला शिकवून सम्राट चंद्रगुप्त घडवले ते. .राजकारण. श्री रामदास स्वामींनी शिवरायांना समजावून देऊन छत्रपती शिवाजी महाराज घडवले ते शिक्षण म्हणजे .राजकारण. भ्रष्टाचारात लडबडलेले आणि सत्तेसाठी हपापलेले देशद्रोही सत्तेसाठी जी कपट कारस्थाने करतात ते राजकारण नव्हे. देशहित समोर ठेऊन गैर लोकांच्या हाती देशाचा कारभार जाऊ नये ह्या उच्च हेतूने योजनापूर्वक टाकलेली पावले म्हणजे 'राजकारण'. दासबोध हा समर्थ रामदासांनी रचला. त्याचे लिखाण त्यांचे पट्टशिष्य कल्याण स्वामींनी केले. रायगड जिल्ह्यातीर्ल अत्यंत निबीड अरण्यात विसावलेल्या शिवथरची घळ या ठिकाणी हे लेखन झाले.हा ग्रंथ म्हणजे गुरु-शिष्य संवाद आहे. समर्थ रामदास स्वामींनी दासबोधाचे वर्णन खालीलप्रमाणे करून ठेवले आहे... भक्तांचेनि साभिमानें। कृपा केली दाशरथीनें। समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध वीस दशक दासबोध। श्रवणद्वारें घेतां शोध। मननकर्त्यास विशद। परमार्थ होतो वीस दशक दोनीसें समास। साधकें पाहावें सावकास। विवरतां विशेषाविशेष। कळों लागे ग्रंथाचें करावें स्तवन। स्तवनाचें काये प्रयोजन। येथें प्रत्ययास कारण। प्रत्ययो पाहावा ।। जय जय रघुवीर समर्थ ह्या महान ग्रंथाच्या १९व्या दशकाच्या ९व्या समासाचे शीर्षक आहे 'राजकारणनिरूपण'. कुठल्या ओवीचा अर्थ आहे हे पुढे कंसात दिलेल्या क्रमांकावरून लक्षात येईल. जो ज्ञानी आणि वैराग्यसंपन्न पुरुष असतो, त्याला जर लोकसंग्रह (म्हणजे माणसे जमवणे नाही. लोकसंग्रह म्हणजे लोककल्याण) करण्याचा हव्यास असेल, तर प्रथम त्याने अखंड सावकाश एकांत सेवन करावा. (१) एकांतात युक्ती-प्रयुक्ती सुचतात. अखंड चिंतन आणि चर्चा होतात, आणि लोकांची स्थिती-गतीही कळून येते. (२) दुसऱ्याच्या मनात जे जे काही असेल ते ते जर आधीच समजले, तर दुसऱ्याला कपट करताच येत नाही. सहजच कृत्रिमपणे वागणेच खुंटते. (५) लोकांच्या मागे उपासनेची उदंड कामे नित्यनेमाने लावून द्यावीत म्हणजे त्यांना लबाडी करायला अवसरच मिळत नाही. (८) चोरालाच भांडारी करावे आणि त्याच्या हातून काही चुकले तर त्याला सांभाळून घ्यावे आणि त्याला हळूहळू शिकवून मूर्खपणाच्या गुंत्यातून मोकळे करावे. (९) या सर्व पूर्वीच्याच गोष्टी आहेत. कुणाही प्राण्याला कष्टी न होऊ देता मुत्सद्देगिरीने चहूकडील लोकांना आपल्याकडे आकर्षित करून घ्यावे. (१०) नष्ट माणसाची दुसऱ्या नष्ट माणसाशी गाठ घालून द्यावी. वाचाळाची दुसऱ्या वाचाळाशी गाठ घालावी. आपल्याबद्दल संशय निर्माण होईल, असे वागूच नये. (११) काट्याने काटा काढावा, पण हे कळू देऊ नये. गबाळेपणाचा किंवा अजाणतेपणाचा आपल्याबद्दल असलेला समज तसाच राहू द्यावा. (१२) महंत असा असावा की, त्याच्याविषयी ऐकूनच लोकांना त्याला पाहाण्याची आवड उत्पन्न व्हावी आणि प्रत्यक्ष तो दिसल्यावर ती आवड अधिकच बळकट व्हावी. आत्मीयतेमुळे सेवकांना त्याच्याविषयी परकेपणा वाटू नये, असे त्याने वागावे. (१४) जे काम करावयाचे असेल त्याविषयी सर्वांनाच सर्व काही कळले तर ते उघड होते. म्हणून असे घडणार नाही हे पहावे. (१७) मुख्य सूत्र महंताने आपल्या हाती ठेवावे आणि लोकांकडून काम करवून घ्यावे. राजकारणामध्ये कित्येक धूर्त लोक एकत्र जमवावेत. (१८) जे बोलके वादपटू धूर्त लोक असतील त्यांच्याशी झुंज द्यावी आणि त्यांना नामोहरम करावे. दुर्जनांच्यामुळे राजकारण अडले, असे होऊ देऊ नये. (१९) गावगुंडांना वर्मी पकडून त्यांची मस्ती जिरवावी. इतरत्र त्यांचा उपयोग करता येण्यासारखा असल्याने त्यांना आपलेसे करून ठेवावे. त्यांना बुडवू नये. (२०) दुष्ट आणि दुर्जन यांना भिऊन आपण आपले राजकारण जर सांभाळले नाही, तर बरे-वाईट सर्व प्रगट होऊन कार्याचा नाश होईल. (२१) मोठा लोकसंग्रह करायचा असेल, तर तंबूच्या दोऱ्या अर्थात व्यापाची शक्ती, साह्य करणारी माणसे बळकट खंबीर असावी लागतात. मठ करून महंतीचा गर्व धरू नये. (२२) दुर्जन लोक कोण आहेत, हे समजून घ्यावे, पण ते प्रगट करू नये. त्यांना महत्त्व देऊन सज्जनांच्या सारखेच आळवावे. (२३) जर लोकांत आपण त्यांचा दुर्जनपणा प्रगट केला, तर मग आपल्या कार्यात अखंड कटकट निर्माण होते. म्हणून ती वाटच बुजवून टाकावी. (२४)शत्रूच्या फौजा पाहिल्या की रणशूर असतात त्याचे बाहू, भुजा स्फुरण पावू लागतात. मात्र राजा परमार्थाचा कैवारी असा असावा. (२५) त्याला पाहताच दुर्जनांना त्याचा धाक वाटावा आणि त्याने दुर्जनांना मारलेल्या तडाख्याच्या अनुभवामुळे बंड आणि पाखंड यांची सहज धूळधाण व्हावी. (२६) ही सर्व चातुर्याची कामे आहेत. राजकारणात अगदी व्यवस्थित नियंत्रितपणाने राजकारण करावे लागते. त्यात ढिलेपणाच्या भ्रमाने वागून चालत नाही. (२७) असा राजकारणी महंत लोकांच्या सहसा दृष्टीसच पडत नाही. पण ठायी ठायी त्याच्यासंबंधीच गोष्टी चालतात. त्याने आपल्या वक्तृत्वाने सर्व जग (सृष्टी) आपल्याकडे आकर्षित करून सहसा दृष्टीसच पडत नाही. पण ठायी ठायी त्याच्यासंबंधीच गोष्टी चालतात. त्याने आपल्या वक्तृत्वाने सर्व जग (सृष्टी) आपल्याकडे आकर्षित करून घेतलेले असते. (२८) गुरगुरणाऱ्यापुढे दुसरा गुरगुरणारा उभा करावा. टोणप्यापुढे म्हणजे मूर्खापुढे दुसरा मूर्ख योजावा. गलेलठ्ठ माणसाची गाठ दुसऱ्या गलेलठ्ठ माणसाशी घालून द्यावी. (२९) दांडग्यासाठी दुसरा दांडगा योजावा. उर्मट माणसास दुसरा उर्मटच योजला पाहिजे. लुच्चा असेल त्यास दुसऱ्या लुच्च्या माणसासमोर उभे करावे. याप्रमाणे जशास तसे अगत्य योजावे. (३०) जशास तसे भेटले की मग सभेला रंग भरतो. पण इतके झाले तरी मूळ मालक कोठे आहे, हे मात्र लोकांच्या दृष्टीस पडू देऊ नये. (३१) इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'राजकारणनिरूपणनाम" समास नववा समाप्त.

# उन्हाळ्यात कांदा खाण्याचे फायदे

**निसर्ग चक्र टिम** - सध्या उन्हाळा सुरू झाला आहे. तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. अशात अनेकांना वाढत्या उष्णतेमुळे शारीरिक थकवा आणि शरीरात पाण्याची कमतरता जाणवत आहे. यामुळे उष्माघातच नव्हे तर हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोकासुद्धा वाढू शकतो. त्यामुळे आधीच हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजार असलेल्या लोकांनी काळजी घेणे आवश्यक आहे.

कांदा हा नैसर्गिकरित्या थंड असतो. त्यामुळे उन्हाळ्यात आहारामध्ये याचा समावेश महत्त्वाचा मानला जातो. कांद्यामध्ये असलेले पाणी शरीरातील पाण्याची कमतरता दूर करतात. याशिवाय यात सोडियम आणि पोटॅशियमची मात्रा अधिक असते, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन राखण्यास मदत करतात.

कांद्यामध्ये खनिजे आणि जीवनसत्त्वे विशेषत: व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असतात. या घटकांमुळे शरीराला पोषक घटक मिळतात आणि आपली रोगप्रतिकारशक्तीसुद्धा वाढते.

कांद्यामध्ये क्वेर्सेटिन आणि सल्फर सारखे पदार्थ असतात, जे शरीरातील घाम शोषून घेऊन शरीराला थंड करतात आणि उष्णता कमी करतात. क्वेर्सेटिन हिस्टामाइन्सला दूर पळवते. हिस्टामाइन्स या रसायनामुळे उष्णतेपासून आपल्याला अॅलर्जी होऊ शकते. कांदा पचनक्रियेशी संबंधित एन्झाइम्स सक्रिय करतात आणि त्यामुळे पचनक्रिया सुधारते. कांदा हा फायबर आणि प्रीबायोटिक्सचा चांगला स्त्रोत आहे, जो आतड्यांमधील बॅक्टेरियाला पोषक तत्वे पुरवतात. या बॅक्टेरियांमुळे फॅटी ॲसिड तयार होते, जे पचनक्रियेसाठी फायदेशीर आहे. कांद्यामधील क्रोमियम रक्तातील साखरेला नियंत्रित ठेवते. कांद्यामुळे वारंवार वॉशरूम लागते, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते. एका अभ्यासात सांगितल्याप्रमाणे कांद्याच्या अर्काच्या सिस्टीन सल्फोक्सिाइड या गोळ्या घेतल्यामुळे झोप सुधारते.



उन्हाळ्यात कांद्याचा समावेश सॅलेडआणि कोल्ड सूपमध्ये करू शकता. चांगल्या चवीसह तुम्ही पौष्टिक आहार घेऊ शकता.दररोज जेवणात कांद्याचा समावेश करा. सॅलेड्स, सँडविच आणि इतर पदार्थांमध्ये कांद्याचा समावेश करा.

शरीरात पाण्याची पातळी राखण्यासाठी काकडी आणि टरबूज यांसारख्या पाणीयुक्त पदार्थांसह कांद्याचे सेवन करा. जेवण करताना तोंडी लावण्यासाठी ताटामध्ये कांद्याचे काप घ्या.

# जगातील सर्वात मोठे फूल रॅफ्लेसिया अर्नोल्डी

**निसर्ग चक्र टिम** - या पृथीवर, निसर्गात अनेक प्रकारचे आणि प्रजातींचे सजीव वास करतात. यात सूक्ष्म जीवापासून ते अवाढव्य प्राणी आणि लहानशा रोपापासून ते महाकाय वृक्षांचा समावेश आहे. त्याच निसर्गात अशा काही गोष्टी आहेत, ज्या आपल्याला आश्चर्यचकित करतात. अगदी सोपे उदाहरण म्हणजे आपला खोल अथांग समुद्र, अवकाशात दिसणारे असंख्य तारे. मानव अंतराळापासून ते समुद्राच्या खोलात काय दडले आहे याचा सतत शोध घेत असतो; त्यावर अभ्यास करीत असतो. तसेच पृथ्वीवर असलेल्या सुंदर आणि नाजूक अशा पाना-फुलांचासुद्धा आपण शोध घेत असतो, त्यावर अभ्यास करत असतो.

आज आपण अशाच एका अनोख्या आणि विचित्र फुलाबद्दल माहिती घेणार आहोत. हे फूल आपल्या जाई, जुई, चाफा, गुलाब यांसारखे मुळीच नाहीये. हे एक अतिशय खास फूल आहे. कारण ते जगातील सर्वात मोठे असे फूल आहे, याचे नाव रॅफ्लेसिया असे आहे. नेमकी या फुलाची काय खासियत आहे, हे कुठे उगवते, त्याचा आकार किती आहे हे पाहा.

रॅफ्लेसिया अर्नोल्डी – जगातील सर्वात मोठे फूल

रॅफ्लेसिया अर्नोल्डी हे फूल सुमात्रा आणि बोर्नियो बेटांवर उगवते. या फुलाची उंची ही साधारण चार फुटापर्यंत वाढू शकते, तर त्याची रुंदी ही सुमारे तीन फूट इतकी असते. आता एवढ्या मोठ्या फुलाचा गंध कसा असेल, असा तुम्हाला प्रश्न पडला असेल. मात्र, हीच आपण या फुलाची खासियत म्हणू शकतो. या फुलाला वास तर आहे, परंतु तो इतर फुलांप्रमाणे गोडनाहीये.

बीबीसीच्या डिस्कव्हरी वाईल्ड लाईफच्या एका लेखानुसार, रॅफ्लेसिया हे फूल उमलल्यानंतर त्याचा अत्यंत घाणेरडा असा दुर्गंध संपूर्ण जंगलात पसरतो. याच्या वासाचे वर्णन करायचे झाल्यास, रॅफ्लेसियामधून एखाद्या सडलेल्या किंवा सडक्या मांसासारखा कुजका वास येतो. त्यामुळे हे फूल उमलल्यानंतर घाणीवर बसणाऱ्या माश्यांशिवाय इतर कुणीही त्याच्याजवळ फिरकत नाही.

हे फूल साधारण पाच वर्षांनी उमलते. या फुलाला देठ किंवा पान असे काहीही नसते. केवळ उष्णकटिबंधीय बेटाच्या जमिनीवर या फुलांची भलीमोठी कळी आपल्याला पाहायला मिळते. या फुलाला लाल रंगाच्या अजस्त्र अशा पाकळ्या असतात. तसेच त्या पाकळ्यांवर पांढऱ्या रंगाचे मोठे ठिपके किंवा उंचवटे असतात. हे विचित्र फूल थोडे केसाळ असून याच्या मध्यभागी दात असल्याचादेखील भास होतो. अशा या कुजका वास असलेल्या फुलाला 'कॉर्प्स फ्लॉवर"देखील म्हटले जाते.



या फुलातदेखील नर आणि मादी असे प्रकार असतात. या फुलाच्या दुर्गंधाने आकर्षित झालेल्या माश्यांद्वारे नर फुलांचे परागकण, मादी फुलापर्यंत पोहोचवून या फुलाची प्रजनन क्रिया केली जाते. रॅफ्लेसिया अर्नोल्डी ही एक परजीवी वनस्पती असून, जगातील सर्वात मोठ्या आकाराचे आणि अत्यंत घाणेरड्या वासाचे फूल म्हणून ओळखले जाते, असे डिस्कव्हरी वाईल्डलाईफच्या लेखावरून तसेच, बीबीसी अर्थच्या युट्यूबवरील व्हिडीओच्या माध्यमातून समजते.

# अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला ओळख पटवण्याचे मानपाडा पोलीसांचे आवाहन

**डोंबिवली (निसर्ग चक्र टीम ) :-**

दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास गणेश शिवाजी खनपट यांनी दिलेल्या खबरी वरून ते कामावरून घरी जात असताना कोळेगाव येथील मराठी शाळेच्या बाजूला पिंपळाचे झाडाखाली एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष निपचित पडलेला दिसला असता समाजसेवक खनपट यांनी त्यांचे जवळ जाऊन त्यास उठवण्याचा प्रयत्न केला परंतु तो काही उठला नाही. त्यानंतर त्यांनी ११२ वर कॉल पोलिसांना करून बोलवले नंतर पोलिसांनी सदर अनोळखी इसमास उठवण्याचा प्रयत्न केला परंतु तो काही उठला नाही म्हणून पोलिसांनी ॲम्बुलन्स बोलवून सदर इसमास शास्त्रीनगर हॉस्पिटल डोंबिवली पश्चिम येथे घेऊन गेले असता तेथील ड्युटीवरील डॉक्टरांनी सदर अनोळखी इसमास तपासून संध्याकाळी आठ वाजता दाखल करण्यापूर्वी मयत झाल्याचे घोषित केले .



याबाबत मानपाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर ९४/२०२४ कलम १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली असून मयत सदर इसमाचे वर्णन खालील प्रमाणे हिंदू धर्मीय ,पुरुष, वय अंदाजे ४० ते ४५, बांधा मध्यम, उंची ५०६ फुट ,रंग गोरा ,चेहरा उभट , नाक सरळ, कपाळावर काळसर व्रण, डोक्याचे व दाढीचे केस वाढलेले ,काळे व पांढरे -

इतर वर्णन मिशी वाढलेली काळी व पांढरी ,अंगात नेसूस पांढरे रंगाचा सफारी शर्ट तपकिरी रंगाचे पॅन्ट अशा वर्णनाचा बेवारस मृतदेह सापडला असून त्याची ओळख पटविण्याचे मानपाडा पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी ए.पी. आय. संदीप गोरे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी ८७७९०९०२१५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**२४ कल्याण लोकसभा मतदारसंघांतर्गत २ उमेदवारांची माघार तर २८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात...**

**पान नं. १ वरुन...** ६) गवळी प्रविण शिवाजी – अपनी प्रजाहीत पार्टी ७) पूनम जगन्नाथ बैसाणे – बहुजन रिपब्लीकन सोशालीस्ट पार्टी

८) श्रीकांत शिवाजी वंजारे – पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक) ९) श्रीधर नारायण साळवे – भिम सेना १०) मो.सहाबुद्दीन शेख सुलेमानी ठाकूर – वंचित बहुजन आघाडी ११) सुशीला काशिनाथ कांबळे – बहुजन समाज पार्टी (आंबेडकर) १२) संभाजी जगन्नाथ जाधव – संयुक्त भारत पक्ष 13) हिंदुराव दादू पाटील –राष्ट्रीय मराठा पार्टी १४) अजय श्याम मोर्या – अपक्ष १५) अभिजीत वामनराव आवाडे-बिचुकले – अपक्ष १६) अमरिश राज मोरजकर – अपक्ष १७) अरुण वामन जाधव – अपक्ष १८) अश्विनी अमोल केंद्रे - अपक्ष १९) चंद्रकांत रंभाजी मोटे - अपक्ष २०) नफिस अहमद अन्सारी - अपक्ष २१) प्राजक्ता निलेश येलवे – अपक्ष २२) मोहम्मद यूसुफ खान - अपक्ष २3) राकेश कुमार धीसूलाल जैन - अपक्ष २४) शिवा कृष्णमूर्ती अय्यर - अपक्ष २५) डॉ.सचिन साहेबराव पाटील - अपक्ष २६) सलीमउद्दीन खलीलउद्दीन शेख - अपक्ष २७) हितेश जयकिशन जेसवानी - अपक्ष २८) ज्ञानेश्वर दत्तात्रय लोखंडे – अपक्ष

# हेमंत करकरेंचा मृत्यू पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीने ?

**पान नं. ४ वरुन** ... कसाब किंवा इस्माईल खान यांच्या रायफलमधून उडवलेल्या नव्हत्या. त्या जजमेंटमध्ये आणि फॉरेन्सिकच्या रिपोर्टमध्ये असंही म्हटलं आहे, पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये करकरेंच्या बॉडीवर त्यांच्या मानेपासून ते खांद्याच्या दोन इंचाच्या भागापर्यंत रिव्हॉल्वरने पाच गोळ्या वरून खाली पोटात मारल्या आहेत. पाच गोळ्या मारल्या त्यातल्या तीन निघून गेल्या, दोन पोटातच राहिल्या, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला', असा दावा मुश्रीफ यांनी केला आहे.'या कुणाच्या गोळ्या होत्या? कारण पोस्टमॉर्टम रिपोर्ट त्यावेळी कोर्टासमोर होता. तो पोस्टमॉर्टम रिपोर्ट उज्ज्वल निकम यांच्याकडे होता. त्यांनी त्याचवेळी कोर्टाला विनंती करायला पाहिजे होती की त्यांनी तपास यंत्रणांना आदेश द्यावा, या गोळ्या कुणी मारल्या याची

चौकशी करा. गोळ्या कुणी मारल्या हे त्यांना माहिती होतं, त्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी त्यांनी तशी विनंती कोर्टाला केली नाही', असं मुश्रीफ म्हणाले.

'मागच्या तीन-चार वर्षात मी स्वत: याचा तपास केला. २०१९ पर्यंत मी तपास केला आणि परिस्थितीजन्य पुरावा मी तयार केला, त्याच्यावरून संजय गोवीलकर नावाचे एक असिस्टंट पोलीस इन्सपेक्टर होते त्यांनी या गोळ्या मारल्या या निर्णयापर्यंत मी आलो. याचा पुन्हा तपास व्हावा. तिघांच्याविरोधात गुन्हे दाखल व्हावेत. प्रभाकर आलोक ज्यांनी हल्ला होणार ही माहिती लपवून ठेवली. संजय गोवीलकर ज्यांनी या गोळ्या करकरेंना मारल्या आणि ही माहिती लपवणारे उज्ज्वल निकम, या तिघांवर गुन्हे दाखल व्हावेत', असे खळबळजनक आरोप मुश्रीफ यांनी केले आहेत. 'हा मुद्दा आता का उपस्थित झाला मला माहिती नाही. यात राजकारण असू शकेल, पण त्यामुळे काही चांगलं होत असेल तर बरं आहे ना. हा निवडणुकीचा मुद्दा नाहीये.

निवडणूक झाली तरी हा मुद्दा चालू राहिला पाहिजे, याचा पाठपुरावा झाला पाहिजे", अशी मागणीही मुश्रीफ यांनी केली आहे.

# पेटंट कायद्यातील बदल कशासाठी? कुणासाठी?

**भारताने मार्च २०२४ मध्ये पेटंट कायद्यात काही मूलभूत बदल केलेले आहेत. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे आणि त्यांचे संभाव्य दुष्परिणाम समजून घेणे गरजेचे आहे. विकसित देशांपेक्षा अधिक समाजाभिमुख असलेल्या आपल्या पेटंट कायद्यात करण्यात आलेल्या दोन महत्त्वपूर्ण बदलांचा औषधनिर्मितीच नाही तर कृषी, जैवतंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांमधील कंपन्यांवरही मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. - सागर अत्रे**

भारत गेली अनेक दशके 'जगाची फार्मसी' म्हणून ओळखला जातो. गेल्या वर्षी प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, जगभर वापरल्या जाणाऱ्या औषधांपैकी १३% औषधांची भारतात निर्मिती होते आणि ती २०० देशांना पुरवली जातात. तसेच भारतातील लसनिर्मिती करणाऱ्या कंपन्याही अनेक महत्त्वाच्या लशी १७० देशांना पुरवतात. भारताची पेटंट व्यवस्था आणि त्याची कायदेशीर रचना भारतीय औषध उद्योगाच्या यशाचे एक मोठे कारण मानले जाते. परंतु भारताने मार्च २०२४ मध्ये पेटंट कायद्यात काही मूलभूत बदल केलेले आहेत. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे आणि त्यांचे संभाव्य दुष्परिणाम समजून घेणे गरजेचे आहे.

पेटंट म्हणजे कुठल्याही संशोधकाला त्याच्या निर्मितीतून ठरावीक काळासाठी योग्य तो आर्थिक मोबदला मिळवण्यासाठी दिला गेलेला हक्क. प्रत्येक पेटंटची कालमर्यादा ही साधारणत: २० वर्षे असते. औषधाचा शोध लागून, त्याच्या गुणवत्ता आणि सुरक्षिततेच्या चाचण्या होतानाच बहुराष्ट्रीय कंपन्या एका विशिष्ट टप्प्यानंतर पेटंटसाठी अर्ज करून ठेवतात. या हिशेबाने साधारणत: १०-१२ वर्षे पेटंटचा अंमल असेपर्यंत त्या उत्पादनाच्या निर्मितीस इतरांना बंदी असते. कुठलेही संशोधन करण्यास लागणारा मोठा खर्च, काही संशोधन अयशस्वी ठरल्याचे नुकसान, हे सर्व भरून काढण्यासाठी ही प्रणाली महत्त्वाची आहे.

भारताचा पेटंट कायदा १९७० मध्ये अमलात आला. तत्कालीन राज्यकर्त्यांनी भारताची अर्थव्यवस्था आणि उद्योग प्रगत देशांप्रमाणे नसून येथे उत्पादनांवर पेटंट देणे धोक्याचे ठरेल हे जाणले. भारतात पेटंट हे उत्पादनावर न देता निर्मिती प्रक्रियेवर दिले जाऊ लागले. एखाद्याने एखाद्या उत्पादनाचा अभ्यास करून त्याच्या निर्मितीची दुसरी प्रक्रिया शोधली, तर त्या उत्पादनाच्या निर्मितीस त्याला मोकळीक होती. औषधांचा रासायनिक अभ्यास करून त्याच्या निर्मितीची वेगळी प्रक्रिया शोधणे हे शक्य असतेच. पाश्चिमात्य कंपन्यांना प्रचंड मोबदला देण्याची कुवत तेव्हा कोणत्याच देशी औषध कंपनीमध्ये नव्हती. या कायद्याचा वापर करून अनेक औषधी कंपन्यांनी औषधनिर्मितीच्या नवीन प्रक्रिया शोधल्या आणि हळूहळू भारत औषधनिर्माण क्षेत्रातला एक महत्त्वाचा देश गणला जाऊ लागला. आफ्रिकेत १९९०च्या दशकात आलेल्या एड्सच्या साथीत भारतनिर्मित औषधांमुळे लाखो प्राण वाचले हे सर्वज्ञात आहे. जे औषध अमेरिकन कंपन्या १२ हजार डॉलर्स प्रति व्यक्ती प्रति वर्ष विकत होत्या, तेच औषध भारतीय कंपन्यांनी ३६० डॉलर्स प्रति व्यक्ती प्रति वर्ष या किमतीला विकले.

संशोधन साखळी आणि पेटंट - जगातील विद्यापीठे, स्वायत्त किंवा इतर संशोधन संस्था यांच्याकडून अनेक प्रकारचे संशोधन होत असते; आपल्या आर्थिक ताकदीचा वापर करून अनेक औषधी कंपन्या अशी संशोधने आणि कल्पना विकत घेऊन ठेवतात, पण त्यावर अनेक वर्षे काम मात्र होत नाही, याला 'पेटंट होर्डिग' असे म्हणतात. हे खर्च बडया कंपन्यांना जड जात नाहीत.मोठया कंपन्यांची पेटंट होर्डिगची मानसिकता लक्षात घेऊन भारतातील पेटंट कायद्यात एक नियम ठेवण्यात आला. त्याचे दोन पैलू होते. औषधी कंपन्यांना कुठलेही पेटंट नुसतेच घेऊन ठेवता येत नसे, कंपनीने ते वापरणे तरी अपेक्षित होते, नाहीतर इतर कोणाला तरी ते वापरायला देणे अपेक्षित होते. यातले काहीच होत नसेल तर त्या उत्पादनाचा 'सक्तीचा परवाना' पेटंट कार्यालय इतर उत्पादकांना देऊ शकत होते. दरवर्षी पेटंटधारकाला ज्यावर पेटंट घेतले आहे ते संशोधन कसे वापरले गेले, त्यातील देशात आणि विदेशातून आयात केलेल्या उत्पादनाचे प्रमाण, उत्पादनाचा नेमका उपयोग हे सर्व विस्तृतपणे मांडणारा 'फॉर्म २७' अहवाल सादर करणे बंधनकारक होते. त्यामुळे, महाग, पेटंट असलेली औषधे भारतीय कंपन्यांना स्वस्तात उत्पादित करून लोकांना उपलब्ध करून देणे शक्य होत असे. २०१३ मध्ये मूत्रिपडाच्या कर्करोगावर प्रभावी सोराफेनीब हे औषध बाजारात रास्त किमतीला उपलब्ध नाही अशी नाटको या कंपनीने याचिका केल्यावर भारतीय शासनाने 'बेअर'च्या या उत्पादनाचा परवाना 'नाटको'ला दिला. 'बेअर' या औषधाच्या एका महिन्याच्या डोससाठी २,८४,००० रुपये आकारत असे. पेटंट कार्यालयाने आणि नंतर न्यायालयांनी नाटकोला सोराफेनीबचा परवाना देऊ केल्यावर महिनाभर लागणाऱ्या डोससाठी नाटको या औषधाचे दहा हजार रुपये आकारूनही नफा कमावू शकत होती. अनेक अशी औषधे देशातील रुग्णांना केवळ या कायद्यामुळे मिळाली आहेत. कोविड काळात याच नियमाचा वापर करून कोविड लशीच्या उत्पादनाचा परवाना इतर भारतीय कंपन्यांना देऊन किंमत आणखी कमी का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला गेला होता.

नवीन तरतुदीतील त्रुटी - या वर्षी केलेल्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे फॉर्म २७ मधलीच माहिती अपुरी असल्याने कुठल्याही कंपनीने पेटंट घेऊन त्याचा वापर न करता 'पेटंट होर्डिग' केले तरी त्या कंपनीला जाब विचारता येणार नाही तसेच इतर कुठल्या कंपनीला त्या औषधाचे उत्पादन करण्यासाठी सक्तीचा परवाना द्यावा, असा युक्तिवाद करणेही अवघड होईल.

अनेक औषधी कंपन्यांची पेटंटच्या बाबतीतली आणखी एक लबाडी म्हणजे 'एव्हरग्रीनिंग'. याचा अर्थ म्हणजे एखाद्या मूळ औषधाचे पेटंट संपत आले की त्यात काही किरकोळ रासायनिक बदल करून ते 'नावीन्यपूर्ण' म्हणवून त्यावर आणखी एक पेटंट घेऊन मक्तेदारी शाबूत ठेवायची. भारतीय पेटंट कायद्यामध्ये याविरुद्ध विभाग (३)(ड) ही तरतूद करण्यात आली. कुठल्याही पेटंट असलेल्या उत्पादनात थोडासा फेरफार अथवा क्षुल्लक बदल करून त्यावर नवीन पेटंट दिले जाऊ नये यासाठी पेटंट कार्यालयाकडे या नियमानुसार विरोध नोंदवता येत असे. असा विरोध नोंदवल्यास मूळ उत्पादकाला नवीन पेटंट का दिले जावे याची सफाई देणे बंधनकारक होते. बहुतांश वेळेला या चोरमार्गाने मिळणाऱ्या पेटंटचे समर्थन कंपनी करू शकत नसत आणि परिणामत: 'नवीन' पेटंट आपोआपच रद्दबातल ठरून जुने उत्पादन पेटंटमुक्त होई. पाश्चिमात्य कंपन्यांचा भारतीय औषधनिर्माण क्षेत्रावर आणि सरकारवर या पेटंट कायद्यातील तरतुदींमुळे प्रचंड रोष होताच. या रोषाची पहिली परिणती दिसली ती १९९५ च्या जागतिक व्यापार संघटनेच्या ट्रिप्स करारात. या करारप्रमाणे जगभरातील औषधनिर्माण, शेती, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांतील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांच्या शासनांच्या मार्फत विकसनशील देशांवर दबाव आणून पेटंट कायदे 'सुसंवादित' करावेत, म्हणजे थोडक्यात उत्पादनांना पेटंट द्यावे असे बंधन घातले. विकसनशील देशांना २००५ वर्षांपर्यंत हा कायदा बदलण्याची मुभा देण्यात आली, आणि तो तसा भारताने बदललाही.

भारतात महत्त्वाच्या औषधांवर किंवा उत्पादनांवर कुठलेही पेटंट देताना त्यास कोणीही विरोध करू शकत




असे, आणि अशा कायदेशीर लढायांनी अनेकदा देशाचा फायदाच झाला आहे. देशात अलीकडेच टऊफ, म्हणजे अर्थात मल्टी-ड्रग- रेझिस्टंट, क्षयरोगावर प्रभावी ठरणाऱ्या बेडाक्वीलीन या औषधाच्या 'नवीन' पेटंटला विरोध झाला आणि तो यशस्वी ठरला. प्रति रुग्ण ३३ हजार इतका खर्च येण्याऐवजी आता हे औषध अगदी काही हजार रुपयांना बाजारात उपलब्ध होईल. सध्या क्षयरोगावरची औषधे सरकारच क्षयग्रस्तांना पुरवत असल्यामुळे याचा फायदा थेट सरकारच्या औषधांच्या खर्चावर होणार आहे. आता या कायद्यात दोन मोठे बदल करण्यात आले आहेत. पहिला म्हणजे कुठल्याही पेटंटला विरोध करण्यास कोण 'पात्र' आहे, हे ठरवण्याचा अधिकार पेटंट अधिकाऱ्याला दिला आहे. सरकार कोणतेही असो, औषधी कंपन्यांचे देशातील राज्यकर्त्यांशी (हित)संबंध असतातच. पेटंट अधिकारी सरकारी कर्मचारी असल्यामुळे पेटंटच्या विरोधकांची 'पात्रता' ठरवण्याच्या प्रक्रियेत सरकारची आवड-निवड किंवा इतर हितसंबंध आड येण्याचा मोठा धोका संभवतो. यातील दुसरा बदल म्हणजे आधीच्या पेटंट कायद्यामध्ये ही विरोध याचिका दाखल करण्यास शुल्क आकारले जात नसे. आता शुल्क असेल आणि ते बदलते असू शकते. ते किमान चार हजार ते २० हजार रुपये आकारले जाऊ शकते. ही रक्कम बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी छोटी असली तरी अनेक स्वयंसेवी संस्था आणि कोणाही व्यक्तीसाठी निश्चितच क्षुल्लक नाही. अशा याचिका लढवताना औषधी कंपन्यांच्या मातब्बर वकिलांच्या फौजेसमोर लढायला लागणारा कायदेशीर खर्च हा वेगळाच.

भारताला हे बदल का करावे लागले याबद्दल अनेक अंदाज आहेत. भारत सरकार सध्या युरोपीय महासंघा बरोबर मुक्त व्यापारी करारांसाठी वाटाघाटी करते आहे, आणि जगातल्या अनेक कंपन्यांची मुख्यालये युरोपमध्ये स्थित आहेत. भारतीय शासनावर या विषयामुळे दबाव येणार हे सर्वत्र ठाऊक होते, आणि त्यासाठी काहीतरी मोर्चेबांधणी करणे गरजेचे होते. परंतु कुठलाही कायदा बदलताना त्यासाठी लागणारी चर्चा, विचारविनिमय हे मात्र इथे झालेले दिसत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांसमोर शरण जाऊनच हे कायदे संमत झाले आहेत असे वाटण्यास वाव आहे. परंतु या बदलांचा दूरगामी परिणाम फक्त सामाजिक आरोग्य कार्यक्रमांवर आणि नवीन, जीवनावश्यक औषधांच्या किमतीवर उपलब्धतेवर सीमित राहणार नाही, तर देशातील औषधनिर्माण क्षेत्रावरही याचे गंभीर परिणाम दिसून येऊ शकतात.

आरोग्य क्षेत्राच्या पलीकडेही कृषी, जैवतंत्रज्ञान आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानातील कंपन्यांवरही याचा मोठा परिणाम होईल. पुढील काळात नवीन, परिणामकारक औषधे सर्वत्र उपलब्ध होण्यासाठी आता आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना अधिकच कठीण कायदेशीर लढाई लढावी लागणार आहे, हे मात्र निश्चित.

लेखक सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात कार्यरत आहेत.

# म्हातारपणी पक्ष्यांची पिसे पांढरी का पडतात? पक्षी किती काळ जगतात!

**निसर्ग चक्र टिम** - आपल्या घराच्या अंगणात पक्ष्यांची ये-जा सुरू असते. कधी कावळा येतो, कधी चिमण्या येतात, कधी पोपट, तर कधी कबुतरे, तर कधी कोकिळा. कधी कधी न पाहिलेला असा वेगळा पक्षी दिसतो. पक्ष्यांना पाहिल्यानंतर तुमच्या मनात कधी असा प्रश्न आला आहे का की, पक्ष्यांचे आयुष्य किती असेल? म्हातारपणी पक्ष्यांचेही पिसे पांढरी होतात का? याच प्रश्नांची उत्तरे या लेखातून जाणून घेऊ या...

पक्षी किती काळ जगू शकतात? जीवन-मृत्यू हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे मानवाप्रमाणे प्राणी-पक्षी यांचे देखील आयुर्मान असते. पक्षी त्यांचे आयुष्य जलद गतीने जगतात. याचा अर्थ असा नाही की, ते तरुण अवस्थेतच मरतात. ते समान आकाराच्या सस्तन प्राण्यांच्या दुप्पट दराने ऊर्जा वापरतात. त्यामुळे हानिकारक बायोकेमिकल उप-उत्पादनांच्या जलद संचयनामुळे पक्षी सैद्धांतिकदृष्ट्या अधिक लवकर वयात येतात.

असे असले तरीही लोक हे लक्षात घेत नाहीत की, पक्षी हे साधारण त्यांच्या वयोमर्यादेपेक्षा तिप्पट जगतात. तसेच त्यांच्यामध्ये वृद्धत्वाची तशी कोणतीही लक्षणे दिसत नाहीत.

पक्षी किती काळ जगतात?

नियमितपणे बंदिवासात असलेले मोठ्या आकाराचे पोपट साधारणपणे ६० वर्षांपेक्षा जास्त काळ जगतात. एकेकाळी विन्स्टन चर्चिलच्या मालकीच्या



मॅकॉने (पोपटाने) वयाचे शतक (१०० वर्षे) पूर्ण केले होते. नोंदविल्या गेलेल्या माहितीनुसार, विस्डम नावाचा लेसन अल्बाट्रॉसहा सर्वांत वयस्क वन्य पक्षी आहे; जो अजूनही ७२व्या वर्षी तंदरुस्त आहे आणि २०२० मध्ये तो अंडी उबविताना दिसला होता.

अगदी पाच ग्रॅम वजनाचा एक छोटासा हमिंगबर्ड १४ वर्षे जगू शकतो. बागेतील पक्ष्यांमध्ये चिमण्या १८ वर्षे, ब्लॅकबर्ड्स २० वर्षे आणि गोल्डफिंच्स २७ वर्षांपर्यंत जगू शकतात. पण, त्यापैकी बहुतेक पक्ष्यांची भक्षकाद्वारे वयाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच शिकार केली जाते आणि जवळजवळ निम्मे पक्षी वयाच्या पहिल्या वर्षी मृत पावतात.

दुसरीकडे काही जपानी लहान पक्षी तीन वर्षांपेक्षा जास्त जगतात. हे काही प्रमाणात त्यांच्या तीव्र पुनरुत्पादकमुळे असू शकते. दोन महिन्यांत लैंगिक परिपक्वता गाठल्यानंतर, ते वर्षातून दोन किंवा तीन वेळा १० अंडी देतात.


म्हातारपणी पक्ष्यांची पिसे पांढरी होतात का?

सस्तन प्राण्यांमध्ये जेव्हा पिसांची मुळे रंगद्रव्ये निर्माण करणे थांबवतात तेव्हा ते पांढरे होऊ लागतात. खरे तर जॅकडॉ (कावळ्याची एक जात) आणि रॉबिन्ससह बरेच पक्षी असे आहेत; ज्यांचे पिसे पांढरे होऊ शकतात. परंतु, सस्तन प्राण्यांच्या तुलनेत पक्ष्यांमध्ये पिसे पांढरे होण्याचे प्रमाण कमी असल्याचे स्पष्ट दिसते. कारण- पक्ष्यांच्या पिसांतील रंग हे बहुतेक वेळा पिसांच्या सूक्ष्म रचनेमुळे तयार होतात; जे रंगद्रव्यांऐवजी वेगवेगळ्या तरंगलांबींवर प्रकाश प्रतिबिंबित करतात.

# नाशिकमधील ग्रीन कॉरिडॉरमुळे दोघांना जीवदान

## नाशिकमधून केवळ अडीच तासांत फुफ्फुस अन् मूत्रपिंड पुण्यात

**अवयवदान हे एक उदात्त कार्य आहे. या बहुमूल्य दानामुळे आम्ही दोन मौल्यवान जीव वाचवू शकलो. आम्ही जलद कृती करून वेळेत अवयव आणले आणि त्यांचे प्रत्यारोपण केले.**
**डॉ. संदीप अट्टावार, डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी**



**एका रुग्णालयातील मेंदूमृत रुग्णाच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या निर्णयामुळे अवयवाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या दोन रुग्णांना जीवदान मिळाले आहे.**

**पुणे : निसर्ग चक्र टिम** - नाशिकमधील एका रुग्णालयातील मेंदूमृत रुग्णाच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या निर्णयामुळे अवयवाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या दोन रुग्णांना जीवदान मिळाले आहे. मेंदूमृत तरुणाचे फुफ्फुस आणि एका मूत्रपिंडाचे दोन रुग्णांना यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे, ग्रीन कॉरिडॉर करून नाशिकमधून केवळ अडीच तासांत हे अवयव पुण्यात आणण्यात आले.

नाशिकमधील एका रुग्णालयातील तरुणाला मेंदूमृत घोषित करण्यात आले. या तरुणाच्या कुटुंबीयांनी अवयवदानाचा निर्णय घेतला.

विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्राच्या प्रतीक्षा यादीनुसार ही माहिती मिळताच डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल डॉक्टरांचे पथक नाशिकला रवाना झाले. नाशिक ते पुणे रस्त्याने अवयवांची वाहतूक सुलभ व्हावी यासाठी ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आला. अवयव प्राप्त होताच ठराविक वेळेच्या आतच त्यांचे प्रत्यारोपण करणे आवश्यक असते. वाहतूक पोलिसांच्या मदतीने ग्रीन कॉरिडॉरच्या योग्य व्यवस्थापनामुळे ४ तासांच्या ऐवजी हे अवयव २ तास आणि ३० मिनिटांत आणणे शक्य झाले.

मूत्रपिंडाशी संबंधित आजाराने ग्रस्त असलेल्या २२ वर्षीय पुरुष रुग्णाला मूत्रपिंडप्रत्यारोपण तर गेल्या चार वर्षांपासून अतिसंवेदनशील न्यूमोनिटिस आजाराने ग्रस्त असलेल्या आणि प्राणवायूवर अवलंबून असलेल्या ४६ वर्षीय पुरुष रुग्णाला फुफ्फुस प्रत्यारोपण करण्यात आले. अवयव प्रत्यारोपण निर्धारित वेळेत त्याच दिवशी झाले. हे अवयव विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्राच्या निकषानुसार अवयवयाची गरज असणाऱ्या रुग्णांपर्यंत पोहोचविण्यात यश मिळाले.

# पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयातून खून!

क्राईम

सौ.सिमा वखरे



**डोंबिवली : निसर्ग चक्र टिम** - आपल्या पत्नीशी शेजारी राहणाऱ्या एका मजुराचे अनैतिक संबंध आहेत. एकमेकांविषयी संशय घेऊन नेहमी दारू पिऊन भांडण करणाऱ्या दोन मजुरांमध्ये शनिवारी रात्री जोरदार भांडण झाले. यामध्ये एका मजुराने लाकडी दांडका दुसऱ्या मजुराच्या डोक्यात मारल्याने त्याचा मृत्यू झाला. डोंबिवली जवळील प्रीमिअर कंपनीच्या मागील उसरघर गाव हद्दीत मानपाडा-दिवा रस्त्यावर ही घटना घडली आहे. जोहरअल्ली प्यारे अन्सारी (३२) असे मयत मजुराचे नाव आहे. तो मुळचा उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे. तो उसरघर येथील काहिनूर या गृहप्रकल्पात तारतंत्री म्हणून काम करत होता. तो उसरघर येथे पत्नी आणि तीन मुलांसह राहत होता. मागील चार वर्षापासून अन्सारी कुटुंब उसरघर भागात राहते. आपल्या पत्नीचे आपल्या शेजारी राहणाऱ्या ताहियादअली अन्सारी (२४) याच्याबरोबर अनैतिक संबंध आहेत, असा संशय घेऊन मयत जोहरअल्ली नेहमी पत्नीला घरात मारहाण करत होता. ताहियादअली याला आपल्या पत्नीचे मयत जोहरअल्ली याच्याबरोबर अनैतिक संबंध आहेत असा संशय होता. या विषयावरून जोहरअल्ली आणि ताहियादअली यांच्यात नेहमी रात्रीच्या वेळेत भांडण होत होते. शनिवारी रात्री जोहरअल्ली नेहमीप्रमाणे दारू पिऊन घरी आला. त्याने पत्नीशी भांडण उकरून काढून तिला बेदम मारहाण शिवीगाळ सुरू केली. पती आपणास जिवानिशी मारील या भीतीने जोहरअल्लीच्या पत्नीने ओरडा केला. यावेळी शेजारी राहणारा ताहियादअली हा धावत घरात आला. त्याने जोहरअल्लीला समजून सांगितले. त्याला शांत राहण्याचा सल्ला दिला. जोहरअल्लीने त्यालाही शिवीगाळ सुरू केली. दोघांमधील घरातील वाद रस्त्यावर सुरू झाला.जोहरअल्ली शिव्या देणे थांबत नाही म्हणून ताहियादअल्ली याने जवळच पडलेला एक लाकडी दांडका उचलून तो जोहरअल्लीच्या डोक्यात जोरात मारला. रक्तस्राव सुरू असल्याने जोहरअल्लीला पत्नीने मानपाडा येथील खासगी रुग्णालयात नेले. तेथे त्याच्यावर उपचार करून पुन्हा घरी आणण्यात आहे. जोहरअल्ली वाटेत बेशुद्ध पडला. त्याला घरी आणण्यात आले. सकाळी त्याला पत्नी झोपेतून उठवित असताना तो कोणतीही हालचाल करत नव्हता. जोहरच्या पत्नीने ठेकेदार सतीश यादव यांच्या साहाय्याने जोहरला पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात नेले. तेथे त्याला डॉक्टरांनी मयत घोषित केले. मानपाडा पोलीस ठाण्यात जोहरअल्लीच्या पत्नीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पुढील तपास पोलीस करत आहेत.

# डोंबिवली फलाट एकवरील आरक्षण केंद्र केले कल्याणच्या बाजुला

**डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एक वर कल्याण बाजुला आरक्षण केंद्राची कार्यालये सुरू करण्यासाठी मुबलक जागा आहे. याठिकाणी लोखंडी संरक्षित डब्यांची दोन कार्यालये सुरू केली जाणार आहेत.**




**डोंबिवली : निसर्ग चक्र टिम** - डोंबिवली रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक एक ते पाच क्रमांकाच्या मध्ये एक पादचारी पूल उभारण्याचे काम रेल्वे प्रशासनाने सुरू केले आहे. या पुलाच्या कामाला फलाट क्रमांक एक वर असलेले आरक्षण केंद्र बाधित होत आहे. त्यामुळे हे आरक्षण केंद्र पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत फलाट क्रमांक एकवर कल्याण बाजुला सुरू करण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने केले आहे. डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एक वर कल्याण बाजुला आरक्षण केंद्राची कार्यालये सुरू करण्यासाठी मुबलक जागा आहे. याठिकाणी लोखंडी संरक्षित डब्यांची दोन कार्यालये सुरू केली जाणार आहेत. याठिकाणी प्रवाशांना रांगेत उभे राहण्याची सोय आहे. अलीकडे फलाट क्रमांक एकच्या बाजुला रिक्षा चालक रिक्षा उभ्या करतात. तसेच फलाट क्रमांक एकवरून बाहेर पडणारे प्रवासी प्रस्तावित आरक्षण केंद्राच्या जागेतून बाहेर पडतात. आरक्षण केंद्र सुरू झाल्यानंतर हार स्ता बंद केला जाणार आहे. डोंबिवली रेल्वे स्थानकातील प्रवाशांची वाढती गर्दी विचारात घेऊन रेल्वे प्रशासनाने दिवा बाजुने डोंबिवली रेल्वे स्थानकातील आरक्षण केंद्र ते डोंबिवली पूर्व भागातील रामनगर रेल्वे तिकीट खिडकी दिशेने अशा पाच फलाटांना जोडणारा पादचारी पूल तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. या पुलाच्या मार्गातील फलाटावरील अडथळे दूर करण्याची कामे ठेकेदाराने प्राधान्याने सुरू केली आहेत. या कामात रेल्वे तिकीट आरक्षण केंद्राचा अडथळा येत होता. प्रवाशांच्या सोयीचा विचार करून रेल्वेने हे आरक्षण केंद्र डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवर कल्याण बाजुला सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.यासाठी लोखंडी संरक्षित तयार डब्यांची कार्यालये तयार करण्यात आली आहेत. डोंबिवली रेल्वे स्थानकात आरक्षित तिकिटे खरेदीसाठी पहाटेपासून प्रवासी, मध्यस्थांच्या रांगा लागलेल्या असतात. प्राधान्याने तिकीट मिळावे म्हणून अनेक प्रवासी रात्रीच आरक्षण केंद्राच्या बाहेर येऊन बसलेले असतात.

या आरक्षण केंद्राच्या बाहेर प्रवाशांना उभे राहण्यासाठी निवारा, बसण्यासाठी आसन, लिहिण्यासाठी मंच अशी व्यवस्था या ठिकाणी ठेवण्यात येणार आहे. नवीन पुलाचे साहित्य ठेवण्यासाठी रेल्वेने ठाकुर्ली उड्डाण पुलाजवळ जागेची सफाई केली आहे. या नवीन पुलामुळे डोंबिवली रेल्वे स्थानकात चार पादचारी पूल असणार आहेत. डोंबिवली रेल्वे स्थानकातून दररोज सुमारे तीन ते साडे तीन लाख प्रवासी दररोज प्रवास करतात. या गर्दीचे विभाजन करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने या पुलांची सुविधा करण्याचा निर्णय घेतला आहे. नियमित रेल्वे तिकीट खिडक्या मात्र आहे त्या ठिकाणीच कायम ठेवण्यात येणार आहेत.

# किराणा दुकानात सापडले साडेचार कोटींचे अमली पदार्थ

**"अंबरनाथ तालुक्यातील मलंगड भागात नेवाळी गावातील एका किराणा दुकानावर छापा टाकून कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने साडेचार कोटी रुपये किमतीचा तीन किलो वजनाचा मॅफोड्रोन नावाच्या अंमली पदार्थांचा साठा शुक्रवारी हस्तगत केला."**

क्राईम

श्री. राजेंद्र वखरे

**डोंबिवली : निसर्ग चक्र टिम** -

अंबरनाथ तालुक्यातील मलंगड भागात नेवाळी गावातील एका किराणा दुकानावर छापा टाकून कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने साडेचार कोटी रुपये किमतीचा तीन किलो वजनाचा मॅफोड्रोन नावाच्या अंमली पदार्थांचा साठा शुक्रवारी हस्तगत केला. या प्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून राजेश कुमार प्रेमचंद तिवारी याला अटक करण्यात आली आहे. त्याचा साथीदार शैलेंद्र अहिरवार हा फरार झाला आहे. त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

या तस्करांनी अंमली पदार्थाचा साठा कुठून आणला. हे अंमली पदार्थ ते कुणाला विकत होते. या रॅकेटमध्ये किती जणांचा सहभाग आहे. याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून कल्याण-डोंबिवली परिसरात अंमली पदार्थांची तस्करी वाढत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. पोलीस तस्करांच्या मागावर होते. काटई-बदलापूर पाईपलाईन छेद रस्त्यावरील कल्याण-मलंगगड रोडला असलेल्या नेवाळी गावात गायत्री किराणा दुकानामध्ये अंमली पदार्थांचा मोठा साठा दडवून गुप्त पद्धतीने विक्री करण्यात येत असल्याची माहिती कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांना गुप्तहेरांकडून मिळाली होती.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली २० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक शुक्रवारी नेवाळी गावातील गायत्री किराणा दुकानात अचानक घुसले. दुकानाची झडती घेताना पथकाच्या हाती दुकानात ३ किलो ४ ग्रॅम वजनाचा मॅफोड्रोनचा साठा आढळून आला. पथकाने दुकानाचा चालक राजेश कुमार तिवारी याला अटक केली. राजेश हा कटाई-बदलापूर पाईपलाईन रोडला असलेल्या धामटण गावातील एकविरा ढाब्याजवळ राहतो. राजेशचा साथीदार शैलेंद्र अहिरवार हा कारवाईनंतर फरार झाला आहे. शैलेंद्र अहिरराव हा ठाण्यातील ढोकळी-कोलशेत परिसरात राहतो. त्याचा शोध पोलीस घेत आहेत.



उत्तरप्रदेश कनेक्शन - राजेश तिवारी आणि शैलेंद्र अहिरराव हे दोघेही अंमली पदार्थांच्या विक्री व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांच्या निकटवर्तीयांचाही उत्तरप्रदेशसह महाराष्ट्रातही अंमली पदार्थांचा व्यवसाय सुरू आहे. किराणा दुकानाच्या नावाखाली राजेश तिवारी याच्या अंमली पदार्थांच्या विक्रीचा धंदा जोरात सुरु होता. या साठ्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ४.५० कोटी आहे.

डोंबिवली एमआयडीसीतील काही किराणा दुकानांच्या समोर दिवसभर तरुण-तरुणींची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. अशी ठिकाणे शोधून पोलिसांनी तेथेही कारवाई सुरू करावी अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे. एमआयडीसीतील एका प्रसिद्ध रुग्णालय समोरील गल्लीत हा प्रकार मागील अनेक महिन्यांपासून सुरू असल्याच्या तक्रारी आहेत.

# हेमंत करकरेंचा मृत्यू पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीने?

## मुश्रीफांचे गौप्यस्फोट, उज्ज्वल निकमांवरही आरोप

**"लोकसभा निवडणुकीत भाजपने उज्ज्वल निकम यांना उमेदवारी दिली. निकम यांना उमेदवारी दिल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी २६/११ हल्ल्याच्या मुद्द्यावरून खळबळजनक आरोप केले."**

**मुंबई : निसर्ग चक्र टिम** - लोकसभा निवडणुकीत भाजपने उज्ज्वल निकम यांना उमेदवारी दिली. निकम यांना उमेदवारी दिल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी २६/११ हल्ल्याच्या मुद्द्यावरून खळबळजनक आरोप केले.'हेमंत करकरेंना लागलेली ती गोळी कसाबच्या बंदुकीतली नव्हती, कुठल्या अतिरेक्याची नव्हती.तर ती गोळी आर एसएस समर्पित एका पोलीस अधिकाऱ्याची होती. त्यावेळी ते पुरावे लपवणारा देशद्रोही कुणी असेल तर तो उज्ज्वल निकम आहे', असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. या वक्तव्यावरून वाद वाढल्यानंतर वडेट्टीवार यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. 'एस एम मुश्रीफ यांनी जे पुस्तक लिहिलं आहे, त्या पुस्तकाचा दाखला घेऊन मी म्हटलं आहे,' असं वडेट्टीवार म्हणाले.वरिष्ठ पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांचा मृत्यू दहशतवादी अजमल कसाब याच्या गोळीने झाला नाही, असा दावा लेखक एस. एम. मुश्रीफ यांनी केला आहे. हू किल्ड करकरे या पुस्तकात त्यांनी केलेल्या या दाव्याने खळबळ उडाली. २६/११ हल्ल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना एक आठवडा आधी मिळालेली होती, असा उल्लेखही या पुस्तकात करण्यात आला.



काय म्हणाले मुश्रीफ? - या पुस्तकातल्या आरोपां बाबत एस एम मुश्रीफ यांनी पुन्हा एकदा प्रतिक्रिया दिली आहे. 'माझ्या पुस्तकात यासंबंधी दोन पुरावे आहेत, एक फॉरेन्सिक सायन्सचा रिपोर्ट, ज्यात गोळ्यांसंदर्भातला रिपोर्ट आहे आणि कोर्टातला केसचा निकाल, या दोन गोष्टींच्या आधारावर माझं मत आहे. कोर्टाच्या जजमेंटमध्ये स्पष्ट म्हणलं आहे की करकरेंच्या शरिरात ज्या गोळ्या मिळाल्या त्या अजमल

उर्वरीत पान नं.३ वर...

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शिवम राजेंद्र वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,अँण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम.आय. डी.सी., ठाणे - बेलापूर रोड ,नवी मुंबई,जि.ठाणे , पिन कोड.नं.४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण , जि. ठाणे , पिन कोड.नं.४२१३०१ येथून प्रकाशित केले.(आर.एन.आय.नं. एम ए एच एम ए आर / २०२२/८३३३८ ) , **Mob. 09987496136**

Printed , Published , Owned & Editor : Shivam Rajendra Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD. , PLOT. No. W-230 , TTC Industrial Area , Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA- 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) **RNI.No. MAHMAR/2022/83338**